समावेश असणार आहे. अवघ्या तीन महिन्यांत ११ हजार ६९५ सहकारी संस्थांची नोंदणी झाली आहे. पहिल्या टप्प्यात नाबार्ड २२ हजार एनडीडीबी ५६,५०० याप्रमाणे संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. तर दुसऱ्या टप्प्यात अनुक्रमे ४७ हजार आणि ४६ हजार ५०० विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात येणार आहेत, असे त्यांनी नमूद केले.

विविध राज्याच्या सहयोगाने बहुउद्देशीय प्राथमिक सहकारी संस्था स्थापन करण्यात येत आहेत असे नमूद करून ते म्हणाले, यामुळे नजीकच्या काळात आपण

केंद्रीय सहकार मंत्री शहा यांनी सांगितले की, या सहकारी संस्थांच्या माध्यमातून अंदाजे ३२ विविध स्वरूपाच्या व्यवसायांची सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. यामध्ये विविध गावात सुविधा केंद्र गॅस पुरवठा मत्स्य पालन, दुधाचा व्यवसाय, वीज वितरण अशा विविध व्यवसायाचा

उद्दीष्ट पूर्ण करू शकू. यावेळी सहकार मंत्री शहा यांच्या हस्ते नव्याने स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्रे, रुपे किसान क्रेडिट कार्ड आणि मायक्रो एटीएमदेखील वितरित करण्यात आले. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय पंचायतराज मंत्री राजीव रंजन सिंह आदी उपस्थित होते.

# सहकार भारतीच्या वतीने पतसंस्था संचालक कर्मचारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

**वर्धा –** वर्धा जिल्हा सहकार भारती आणि पतसंस्था संघ यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या दि. १२ जानेवारीला पतसंस्था संचालक आणि कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा उपनिबंधक सीमा पांडे यांच्या हस्ते वर्गाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. दिवसभराच्या प्रशिक्षण वर्गात पतसंस्थांचे व्यवस्थापन आणि ताळेबंद, संस्थेच्या अधिनियमात झालेले बदल, पतसंस्थांची वसूली, या विषयावर तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या वर्गात सहकार भारती महामंत्री विवेक जुगादे, अशोक नाईक, संतोष पाटील, प्रकाश जाधव हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील सर्व पतसंस्थांचे संचालक, पदाधिकारी आणि कर्मचारी यांनी वर्गात सहभागी व्हावे असे आव्हान सहकार भारतीचे वर्धा जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कोळसे महामंत्री शामकुमार खत्री तसेच जिल्हा पतसंस्था संघाचे अध्यक्ष सुधाकर घवघवे यांनी केले आहे.

यावेळी सहकार भारतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गामध्ये इच्छुकांचा सहभाग वाढावा यासाठी सर्वांनी संघटितपणे प्रयत्न करण्याच्या दृष्टीने आखणी करण्यात आली.

# सहकार भारतीकडून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सत्कार

**लातूर –** महाराष्ट्राचे नवनिर्वाचित सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची नुकतीच अहमदपूर येथे सदिच्छा भेट झाली. सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी सहकार मंत्री पाटील यांचा सत्कार केला. सहकार भारतीचे काम करीत असताना आलेला अनुभव पाटील यांच्यासोबत गप्पातून उलगडला.



तसेच सहकाराच्या क्षेत्राबाबत चर्चा झाली. सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांसोबत सविस्तर चर्चा करण्याचे पाटील यांनी सूचित केले.

# राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा सुरू

**पुणे –** लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेमुळे प्रलंबित असणाऱ्या राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया दि ६ जानेवारीपासून पुन्हा सुरू करण्यात येणार आहे तसे शासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे तसे आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास देण्यात आले आहेत.

या अंतर्गत मतदार याद्या अद्ययावत करणे, तसेच जेथे निवडणुकीची प्रक्रिया थांबली होती तेथून पुढे सुरू करण्याबाबत आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी पुन्हा निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम तयार करणे, तसेच सहकारी संस्थांमध्ये संचालक पदाची रिक्त असणारी पदे भरण्याबाबत योग्य कार्यवाही करण्यात यावी, त्याचप्रमाणे निवडणुकीला पात्र असणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणुका महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २०१४ मधील तरतुदींनुसार सुरू करण्यात याव्यात असेही आदेशामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. गेल्या वर्षी दोन वेळा सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली होती, पण आता नवीन वर्षात सहकारी संस्थांच्या निवडणुका होत आहेत.

# योगीराज सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पुणे –** येथील योगीराज सहकारी पतसंस्थेच्या वतीने नूतन वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन राज्याचे उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकीर शाखाध्यक्ष राजेंद्र मुरकुटे, तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

गेली अनेक वर्षे पतसंस्थेच्या वतीने हा समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे केला जात आहे.

# नागपूर नागरिक सहकारी बँकेच्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन




**नागपूर** – येथील नागपूर नागरिक सहकारी बँकेच्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन नुकतेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या करण्यात आले. यावेळी बँक अध्यक्ष संजय भेंडे आणि अन्य संचालक होते.

सरसंघचालक भागवत यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संघ स्वयंसेवक समाजातील ज्या ज्या क्षेत्रात काम करीत आहेत, तेथे त्यांचे स्वयंसेवकत्त्व प्रकर्षाने अधोरेखित होते आहे. समाजदेखील संघ विचाराचे अनुकरण करण्यास उत्सुक असल्याचे दिसून येत आहे. परिणामी स्वयंसेवकांची जबाबदारी वाढली आहे. बँक अध्यक्ष भेंडे यांनी स्वागत करून आजवरच्या दिनदर्शिकांचा आढावा घेतला. महेश नंदनवार यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला बँकेचे संचालक, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, अधिकारी तसेच खातेदार आणि बँकेचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'सहकारातून समृद्धी' अंतर्गत गाव पातळीवरील सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**लातूर** – केंद्र शासनाच्या सहकार विभागाने सुरू केलेल्या 'सहकारातून समृद्धी' अभियानांतर्गत देशात दहा हजार बहुद्देशीय प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, दुग्ध संस्था, मत्स्य व्यवसाय संस्था स्थापन झाल्या आहेत. या अभियानांतर्गत राज्यातही गाव पातळीवर सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करून, त्या संस्थांच्या माध्यमातून पतपुरवठ्यासह नागरिकांना अधिकाधिक सुविधा पुरविण्यात येणार आहेत, असे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

लातूर येथे झालेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमात पाटील बोलत होते. सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, नाबार्डच्या मुख्य महाव्यवस्थापक रश्मी दराद, लातूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, लातूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अशोक गोविंदपूरकर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संगमेश्वर बदनाळे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रमोद पाटील, जिल्हा विशेष लेखा परीक्षक उमाकांत पवार उपस्थित होते.

सहकार चळवळीमुळे राज्याची प्रगती झाली असून सहकारी साखर कारखाने, सहकारी पतपुरवठा संस्था यामुळे राज्यातील अर्थकारणाला गती मिळाली.

सहकार चळवळ अधिक बळकट करून गाव पातळीवर सहकारी संस्थांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासनाने सहकारातून समृद्धी अभियान हाती घेतले आहे. गाव पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सोसायटीने पतपुरवठा करण्यासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना विविध सेवा पुरविण्यासाठी पुढाकार घ्यावा. यामुळे जास्तीत जास्त लोकांना सहकार चळवळीशी जोडून घेता येईल. तसेच सहकारी संस्थांच्या उत्पन्नात भर पडून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल राज्यातील अनेक भागात सहकारी दुग्ध संस्थांच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायाचा विकास झाला आणि शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण झाले, असे त्यांनी सांगितले.

**सहकार संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याची गरज –**

महिलांनी सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आता सहकारी संस्थांमध्येही महिलांचा सहभाग वाढविण्याची गरज आहे. महिलांकडे



असलेल्या आर्थिक बचतीच्या कौशल्याचा सहकारी संस्था चालविता नक्कीच उपयोग होईल, सहकार चळवळ म्हणजे प्रगतीचा आत्मा आहे. सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातूनही विविध उपक्रम राबविण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

गाव पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारच्या सहकार विभागामार्फत जवळपास १६० विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या योजनेतून देशातील ६३ हजार सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्यात आले असून यामध्ये महाराष्ट्रातील सुमारे १२ हजार संस्थांचा समावेश आहे. विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या माध्यमातून सामूहिक सुविधा केंद्र, दुग्ध संस्था, गोडावून आदी सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सांगितले.

प्रास्ताविक विभागीय सहनिबंधक सुनील शिरापुरकर यांनी केले. प्रातिनिधिक स्वरूपात राज्यातील १५ विविध नवनिर्मित संस्थांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. केंद्र सरकारच्या सहकार विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीविषयी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संगमेश्वर बदनाळे यांनी माहिती सांगितली.

## स्व. लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून

# पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राच्या अद्ययावतीकरणाचा प्रकल्प

**कोल्हापूर –** सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्व. लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून येथील शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पश्चिम महाराष्ट्रातील सातारा सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या अद्ययावती करणाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत अनेकविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये सहकारी संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणावर विणले गेले आहे. यामध्ये सहकारी साखर कारखाने, दूध संघ, सुतगिरणी, नागरी सहकारी बँका, विविध कार्यकारी सोसायटी, सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. या क्षेत्रात खासगी संस्था कार्यरत असल्याने आपोआपच स्पर्धा वाढली आहे हे लक्षात घेता सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी विद्यापीठाने हा प्रकल्प हाती घेतला आहे. सन २०२२ मध्ये विद्यापीठाने पुढाकार घेत प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली. गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत या केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उपलब्ध माहितीनुसार केंद्राच्या माध्यमातून आजवर सुमारे २४०० जणांना प्रशिक्षणाचा लाभ मिळाला आहे जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन समवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे. अशी माहिती केंद्र संचालक डॉ. राजन पडवळ यांनी सांगितली.

# सांगली अर्बन बँकेची दिनदर्शिका प्रकाशित

**सांगली –** सांगली अर्बन को-ऑप. बँकेच्या नवीन वर्षाची दिनदर्शिकेचे प्रकाशन स्व. अण्णा गोडबोले सभागृहात उत्साहात झाला.

स्व. अण्णा गोडबोले स्मृती व्याख्यानाचे प्रमुख वक्ते माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, आमदार सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सुधीर चापोरकर, बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, उपाध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, संचालक सीए अनंत मानवी, एच. वाय. पाटील, विश्वास चितळे, शैलेंद्र तेलंग, संजय पाटील, संजय धामणगावकर, रवींद्र भाकरे, मनोज कोरडे, स्वाती करंदीकर, कालीदास हरिदास, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक आदी उपस्थित होते.



स्व. गोडबोले यांचे स्मृतिदिनी बँकेतर्फे प्रतिवर्षी दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात येते. कार्यक्रमाला बँकेचे खातेदार, सभासद, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीडीसीसी बँकेचे रब्बी हंगामासाठीचे ५७ टक्के उद्दिष्ट पूर्ण

**पुणे –** रब्बी हंगामासाठी पुणे जिल्हा सहकारी बँकेला देण्यात आलेल्या उद्दिष्टांपैकी ५७ टक्के उद्दीष्ट पूर्ण करण्यात बँकेला यश मिळाले आहे. पुणे जिल्हास्तरीय समितीकडून बँकेला हंगामासाठी ६८५ कोटी ७३ लाख रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते.

बँकेने दिलेल्या उद्दिष्टांपैकी ३९६ कोटी ५५ लाख २८ हजार रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. बटाटा, कांदा, ऊस, टोमॅटो, ज्वारी आणि बाजरीच्या पिकासाठी कर्ज घेण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. जिल्ह्यातील सुमारे ५५ हजार २३४ सभासद शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात आले आहे. दमदार पावसामुळे रब्बी पिकांच्या पेरण्यांना मदतच झाली आहे. परिणामी, पीक कर्ज घेण्याचे प्रमाण समाधानकारक राहिले आहे असे सांगण्यात आले.

## पुणे जिल्हा सहकारी बँकेचा तीन पुरस्कारांनी गौरव

**पुणे –** पुणे जिल्हा सहकारी बँकेला नुकतेच तीन पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. यामध्ये सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण बँक, वर्षातील सर्वोत्कृष्ट बँक आणि सर्वोत्तम ग्राहक सेवा या पुरस्कारांचा समावेश आहे. इव्हेटालिस्ट संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. गोवा विधानसभा अध्यक्ष रमेश तवडकर भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ अध्यक्ष दिलीप संघांनी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# कॉसमॉसच्या अध्यक्षपदी प्रल्हाद कोकरे

## संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध



**पुणे –** येथील कॉसमॉस सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ संचालक प्रल्हाद कोकरे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. कोकरे हे गेली २१ वर्ष बँकेच्या संचालक मंडळात कार्यरत आहेत. त्यानंतर त्यांनी उपाध्यक्ष पद सांभाळले आहे. बँकेच्या विविध समित्यांवर त्यांनी काम केले आहे.

कॉसमॉस सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली आहे. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय राऊत यांनी तसे जाहीर केले आहे. संचालक मंडळाच्या एकूण १३ जागा आहेत यासाठी १३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते.

नूतन संचालक याप्रमाणे – रसिका गुप्ता, सुरेखा जोशी, प्रविणकुमार गांधी, अजित गीजरे, सुब्रमणियम संथानम, घनशामभाई अमिन, प्रल्हाद कोकरे, सचिन आपटे, सीए यशवंत कासार, अरविंद तावरे, बाळासाहेब साठे, अनुश्री माळगावकर, रेखा पोकळे.

# पतसंस्थांच्या सक्षमीकरणासाठी प्रशिक्षणाची गरज -दिलीप पतंगे



**सोलापूर –** शासनाने पतसंस्थांसाठी प्रशिक्षण अत्यावश्यक केले असून संस्थेचे कामकाज सुलभ व्हायचे असेल तर कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. जी पतसंस्था प्रशिक्षण टाळेल, त्यांना अडचणींचा सामना करावा लागेल. पतसंस्था सक्षम करायच्या असतील तर संस्थेचे संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेणे महत्वाचे आहे, असे सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी सांगितले.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्र व प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. सहाय्यक निबंधक दत्तात्रय भवर, धनश्री महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा प्रा. शोभा काळुंगे, तात्यासाहेब चव्हाण, दिगंबर भगरे, मारुती बाबर उपस्थित होते.

भवर म्हणाले, कायद्यातील तरतुदींचे ज्ञान सर्वांना असावे, हाच प्रशिक्षणामागचा हेतू आहे. ठेवींना संरक्षण असेल तरच ठेवीदार व संस्था निश्चिंत राहतील. पतसंस्थेचे संचालक व कर्मचाऱ्यांनी संस्थेचा उपविधी वाचला पाहिजे. दैनंदिन कामकाजामध्ये त्याचा नक्कीच फायदा होईल, असे ते म्हणाले.

# सहकार भारती राष्ट्रीय पतसंस्था प्रकोष्ट प्रमुखपदी शिरीष देशपांडे



**पुणे –** सहकार भारती राष्ट्रीय पतसंस्था प्रकोष्ट प्रमुखपदी बुलढाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बुलढाणा अर्बनचे क्षेत्रीय व्यवस्थापक उदय पाचपांडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी लेखापरीक्षण विभागाचे क्षेत्रीय व्यवस्थापक मनोहर देशमुख, वरिष्ठ व्यवस्थापक तुकाराम होले शाखा व्यवस्थापक सविता राठी यावेळी उपस्थित होते.

# सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था अधिक बळकटीकरणासाठी करार

**पुणे –** सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था अधिक बळकट आणि सक्षम व्हाव्यात तसेच व्यवस्थापन कौशल्य प्रशिक्षण यावर आगामी काळात भर देता यावा, यासाठी राज्य आणि पुणे जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्था आणि कौशल्य प्रशिक्षण संस्था यांच्यामध्ये नुकताच करार करण्यात आला आहे.

कर्नल प्रमोद दहितुले, अमोल बिरारी, सुहास पटवर्धन, चारूहास कुलकर्णी, अमित मांजरे उपस्थित होते. महासंघ राज्यातील सुमारे सव्वा लाख गृहनिर्माण सहकारी संस्था आणि सुमारे दोन लाख अपार्टमेंटचे प्रतिनिधित्व करीत आहे.

# सहकारी पतसंस्थांवर जनतेचा विश्वास अबाधित राहावा यासाठी महासंघ प्रयत्नशील

**सोलापूर –** सहकारी पतसंस्थांवर असणारा जनतेचा विश्वास अबाधित राहावा आणि यापुढील काळात तो आणखी विकसित व्हावा, यासाठी महासंघ गेली अनेक वर्षे कार्यरत आहे, असे महासंघाचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी सांगितले. महासंघाचा नववा वर्धापन दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, महासंघाचा कारभार हा शून्यातून सुरू झाला आहे. पण गेल्या काही वर्षांत महासंघाशी अनेक पतसंस्था जोडल्या गेल्या आहेत. संस्थांच्या समोर असणाऱ्या अडचणी दूर करण्याचा महासंघाने कायम प्रयत्न केला आहे. महासंघाला पूर्णवेळ अधिकारी मिळावा, यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. तसेच प्रशिक्षण केंद्राची मान्यता मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी महासंघ उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, संचालक राजेंद्र कुलकर्णी, अप्पाराव इटेकर, मारुती बाबर, व्यवस्थापक मीनाक्षी केंची अधिकारी आदी उपस्थित होते.

# सहकारी बँकांना सुविधा एकाच छत्राखाली मिळण्यासाठी संस्थेची स्थापना

**मुंबई –** राज्यातील सहकारी बँकांनी रोजच्या कामकाजात अधिकाधिक प्रमाणात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा आणि ग्राहकांनादेखील सर्व सुविधा देता याव्यात, यासाठी नॅशनल अर्बन को-ऑप. फायनान्स अँड डेव्हलपमेंट कार्पोरेशनची नुकतीच स्थापना करण्यात आली आहे. ही एक बिगर बँक वित्तीय संस्था आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष ज्योतींद्र मेहता यांनी सांगितली. या संस्थेच्या भांडवलासाठी ३०० कोटी रुपये उभारण्याची अट आरबीआयने टाकली आहे, असे नमूद करून ते म्हणाले, कोणतीही सहकारी बंद होऊ नये, यासाठी ही संस्था काम करणार आहे.

सहकारी बँकांच्या ठेवीचा व्याजदर सध्या ४ टक्के आहे. त्यामध्ये वाढ झाली पाहिजे. त्याच्या बरोबरीने बँकाचा नफा दुप्पट झाला पाहिजे. यासाठी संस्था काम करणार आहे. सहकारी बँकांनी विमा कंपनीबरोबर करार करून शुल्काधारित व्यवसाय सुरू करायला हवा, जेणेकरून सहकारी बँकांच्या उत्पन्नात भर पडण्यास मदत होणार आहे. आजवर ४०० सहकारी बँकांनी शताब्दी पूर्ण केली आहे, असे त्यांनी सांगितले.



# कल्लाप्पाण्णा आवाडे सहकारी साखर कारखाना संचालक पदाची निवडणूक बिनविरोध

**इचलकरंजी** – कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्यांच्या संचालकपदी सन्मती सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पाटील, प्रशांत महादेव कांबळे, महेश पाटील, सुभाष जाधव व दादासाहेब सांगावे यांची निवड झाल्याबद्दल बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सहकारी साखर कारखान्याची सन २४ ते २९ या सालची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. बीओएम अध्यक्ष डॉ. होसकल्ले, शितल पाटील, आण्णा मुरचिट्टे, सी. ए. पाटील, ए. जे. पाटील, महावीर येळरूटे, डॉ. निमा जाधव, अजित कोईक, संजय कुडचे, सीईओ अशोक पाटील, अनंत पुजारी, बोर्ड सेक्रटरी महेश कुंभार उपस्थित होते.

## सहकारी पतसंस्थांच्या विविध समस्यांवर चर्चेतून मार्ग काढणार - आयुक्त तावरे

**पुणे** – राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या विविध समस्यांवर चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढण्यात येणार असल्याचे राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी संगितले. राज्य सहकारी पतसंस्था महासंघाच्या प्रशासकीय कार्यलयात ये बोलत होते. नूतनीकरण झालेल्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त सहकार आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, राज्य सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष काका कोयटे, सहकार विभागाचे उपनिबंधक मिलिंद सोबले यावेळी उपस्थित होते. ते म्हणाले की, राज्याच्या सहकार चळवळीत सहकारी बँक आणि पतसंस्था यांचे महत्वाचे योगदान आहे. साखर उद्योगाप्रमाणे बँक आणि पतसंस्थाना आर्थिक मदत झाली पाहिजे. त्याचप्रमाणे संचालक यांना मानधन मिळायला हवे. तरच सहकार क्षेत्राकडे ओढा वाढण्यास मदत होणार आहे.

कोयटे यांनी सांगितले की, सहकार चळवळीतील महिला आणि युवकांचा सहभाग वाढविण्याबरोबर नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब, वापर वाढविण्यावर भर देण्याची गरज आहे. यावेळी बुलढाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, महासंघाचे संचालक शशिकांत राजोबा उपस्थित होते.

## लाला अर्बन को-ऑप. बँकेची ग्राहकांसाठी मोबाईल बँकिंग सुविधा

**पुणे** – येथील लाला अर्बन को- ऑप. बँकेच्या वतीने ग्राहकांसाठी मोबाईल बँकिंग सुविधा सुरू करण्यात आली आहे. यामध्ये यूपीआय आणि क्यूआर कोड सिस्टिम सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती अध्यक्ष युवराज बाणखेले यांनी सांगितली.

ते म्हणाले, गेल्या अनेक वर्षापासून बँक या सेवेसाठी प्रयत्नशील होती. या नवीन सेवेमुळे बँकेच्या व्यावसायिक व्यवहारात वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या सेवेमुळे व्यापारी आणि मध्यमवर्गीयांना सुविधा उपलब्ध होणार आहे. बँकेच्या सध्या १४ शाखा कार्यरत असून एकूण व्यवसाय ८०६.१८ कोटी असून त्यामध्ये ठेवी ४८१. ३९ कोटींच्या ठेवी आणि ३२४.७९ कोटी रुपयांच्या कर्जाचा समावेश आहे बँकेच्या वतीने सभासदांना १० टक्के लाभांश देण्यात आला आहे. पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या वतीने दोन पुरस्कारांनी बँकेला गौरविण्यात आले आहे.

बँकेच्या वतीने विविध कर्ज योजना आणि रेटिंग सिस्टिमनुसार कर्ज पुरवठा योजना तयार करण्यात आल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी बँकेने ठेव योजना सुरू केली आहे. यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र गुंजाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डी.एन. सुरम यांनी सांगितली.

## विश्वेश्वर सहकारी बँकेच्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पुणे** – येथील दि विश्वेश्वर सहकारी बँकेच्या वतीने नूतन वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष अनिल गाडवे, उपाध्यक्ष राजेंद्र मिरजे, संचालक सीए मनोज साखरे, तसेच अन्य संचालक व्यवस्थापन मंडळाचे सदस्य मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम आपटे आदि यावेळी उपस्थित होते.

बँक अध्यक्ष गाडवे यांनी बँकेविषयी सविस्तर माहिती सांगितली. बँकेचा एकूण व्यवसाय साडे तीन हजार कोटीचा असून सध्या ३० शाखा कार्यरत आहेत. बँकेच्या वतीने ग्राहकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. गेली २५ वर्ष बँकेच्या वतीने दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात येत आहे. बँकेच्या या उपक्रमाचे खातेदारांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# अपर निबंधक मिलिंद आकरे यांची विवेकानंद संस्थेला सदिच्छा भेट



**नागपूर** – सहकार खात्याचे अपर निबंधक मिलिंद आकरे यांनी नुकतीच विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेला सदिच्छा भेट दिली. संस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे, उपाध्यक्ष महेश अंधारे यांनी स्वागत केले. विभागीय सहनिबंधक प्रवीण वानखेडे व जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे उपस्थित होते.

आकरे यांनी सोसायटीच्या कार्याची माहिती घेतली. सहकाराचा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून समाजाच्या उत्थानासाठी सहकाराच्या भावनेतून विवेकानंद सोसायटी कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

# सहकार क्षेत्राच्या विस्तारामुळे रोजगाराच्या संधीत मोठी वाढ

**नवी दिल्ली** – देशातील सहकार क्षेत्राच्या चळवळीमुळे नव्याने सुमारे पांच कोटी स्वयंरोजगार निर्माण तयार झाले आहेत असे एका अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आगामी काही वर्षात यामध्ये आणखी भर पडणे शक्य आहे असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

याबाबत प्रायमस रिसर्चने हा अहवाल तयार केला आहे. अहवालात म्हटले आहे की, देशाच्या विविध राज्यात सहकाराचे क्षेत्र वाढले आहे. परिणामी रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण होण्यास मदत झाली आहे. सन २०१८ पर्यंत ३ कोटी रोजगार उपलब्ध झाले होते. यात आणखी वाढ होण्यासाठी सहकार क्षेत्राने वार्षिक पाच–सहा टक्के वाढीचा वेग कायम ठेवल्यास रोजगाराच्या संधी वाढण्यास हातभार लागणार आहे. सन २०३० पर्यंत जीडीपी तीन ते पांच टक्के वाटा निर्माण करण्याची क्षमता या क्षेत्रात असून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार विचारात घेतले तर वाढीचे प्रमाण दहा टक्के पर्यंत जाऊ शकते, असे नमूद करण्यात आले आहे.

मात्र यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक असणार आहे. त्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य असणार आहे. तसेच नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे आहे असे नमूद करण्यात आले आहे.

# गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या अधिवेशनात विविध मागण्यांचे ठराव संमत

**ठाणे** – येथे नुकत्याच पार पाडलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या अधिवेशनात ठरावाच्या माध्यमातून राज्य शासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या. त्यामध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या संचालकाना भत्ता मिळावा, तसेच प्रशिक्षणाची सुविधा असावी अशा विविध मागण्यांचा समावेश आहे. सर्व मागण्या अधिवेशनात मंजूर करण्यात आल्या.

दि ठाणे डिस्ट्रिक्ट को– ऑप. हौसिंग फेडरेशन आणि ठाणे जिल्हा सहकार विभागाच्या वतीने अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या अधिवेशनात गृहनिर्माण सहकारी संस्थांचे पुनर्विकास, त्यांच्या समस्या याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# तेजस्विनी भवन प्रकल्पाचे नुकतेच लोकार्पण

**अकोला** – येथील महिला आर्थिक विकास महामंडळार्गत लोकसंचलित साधन केंद्र आणि बचत गटातील महिलांच्या योगदानातून निर्माण झालेल्या तेजस्विनी भवन या प्रकल्पाचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी अजित कुंभार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी महाबीजचे योगेश कुंभारकर, जिल्हा महिला आणि बळविकास अधिकारी गिरीश पुसदकर, राजश्री कोलखडे, केंद्राच्या अध्यक्षा सुवर्णा वाघमारे आदी उपस्थित होते.

# जळगाव जनता बँकेतर्फे सहकार भारतीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान



**जळगाव** – सहकार भारती राष्ट्रीय महिला प्रमुख रेवती शेंदुर्णीकर व राष्ट्रीय मंत्री दिलीप पाटील यांची निवड झाल्याबद्दल जळगाव जनता बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सहकार भारतीचे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच अमृतसर येथे पार पडले. या अधिवेशनात नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

सहकार भारती जळगाव जिल्हा ग्रामीण व महानगराच्या कार्यकारिणींची बैठक नुकतीच झाली. यावेळी प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव, उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख बन्सी अंदोरे ग्रामीण जिल्हाध्यक्ष नरेंद्र नारखेडे, महामंत्री शशी बेहेडे, महानगर अध्यक्ष श्रीमती प्रा. शोभाताई पाटील, महामंत्री प्रमोद नगरकर व अन्य कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

## जनता अर्बन बँकेच्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**वाई** – येथील जनता अर्बन बँकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मराठी अभिनेत्री अश्विनी महांगडे यांच्या उपस्थितीमध्ये नुकतेच करण्यात आले. यावेळी बँक अध्यक्ष बळीराम जगताप उपाध्यक्ष शेखर फरांदे, संस्थापक संचालक सुरेश कोरडे मुख्य कार्यकारी अधिकारी रूपाली बुलुंगे, संचालक, अधिकारी उपस्थित होते.

## राज्य सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्षपदी सीए भाऊसाहेब कड

**पुणे** – राज्य सहकारी बँक्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी सीए भाऊसाहेब भगवंत कड यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे.

नागपूर येथे झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली आहे. कड यांनी भारती सहकारी बँकेचे अध्यक्षपद भूषविले आहे. कड यांच्या निवडीबद्दल बँकेचे संचालक, अधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांना सक्षम करण्यासाठी डिजिटलायझेशनचा उपक्रम

**धुळे –** कार्यकारी सोसायट्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाच्या वतीने डिजिटलायझेशनचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्याचा एक भाग म्हणून जिल्ह्यातील ९० संस्थांचे संगणकीकरण करण्यात येणार आहे. याखेरीज आणखी काही संस्थांना या उपक्रमात सहभागी करण्यात येणार आहे, अशी माहिती सहायक निबंधक राजेंद्र विरकर यांनी सांगितली.

गेल्या वर्षभरापासून विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. त्यांअंतर्गत बी बियाणे विक्री परवाना औषध विक्री ऑनलाइन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यामधून सोसायट्यांची आर्थिक बाजू सावरण्यास मदत होणार आहे. संगणकीकरणासाठी एकूण ९० विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांपैकी पहिल्या टप्प्यात काही सोसायाट्यांची निवड करण्यात आली आहे. त्यासाठी संगणक संच देण्यात आले आहेत.

## विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी विश्वास भदाणे

**धुळे –** येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी विश्वास भदाणे आणि उपाध्यक्ष पदी सुशीला देवरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्था संचालक, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व्ही. बी. सुर्वे आणि सचिव उमेश चौधरी यांनी काम पाहिले.

## धुळे नंदुरबार जिल्हा माध्यमिक, उच्च माध्यमिक पतसंस्था कार्यालय कार्यरत

**धुळे –** धुळे आणि नंदुरबार जिल्हा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक पतसंस्थेच्या तिसऱ्या शाखेच्या कार्यालयाचे उद्‌घाटन माजी नगराध्यक्ष डॉ. रवींद्र देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी टी. पी. शिंदे होते. पतसंस्था गेली ३० वर्ष कार्यरत असून सतत ऑडिट 'अ' वर्ग मिळतो आहे आणि कामकाजात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येतो आहे. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी उपस्थित होते.

## मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांची कार्यशाळा यशस्वी

**धुळे –** धुळे जिल्ह्यातील मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांची कार्यशाळा नुकतीच यशस्वी झाली. सुशासन सप्ताहानिमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत ई-श्रम कार्ड योजना, अपघात गट विमा योजना, किसान क्रेडिट तसेच नव्याने लागू करण्यात आलेली व्यवसायिकांची नोदणी आणि विभागाच्या अन्य योजना याबाबत माहिती सांगण्यात आली.

कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक नांद्रे, सहायक निबंधक शेखर साळी यांनी मार्गदर्शन केले. तसेच मत्स्यव्यवसाय सहाय्यक विभागाचे आयुक्त जयेश बळकटे, विकास अधिकारी संतोष देसाई, सहायक अधिकारी अविनाश गायकवाड यांनी विविध प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी जिल्ह्यातील विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे - (फक्त मेसेजसाठी) ९८५०५७१४०५**

**श्री. श्रीकांत पटवर्धन (प्रदेश कार्यालय प्रमुख) ९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय – ऑफिस क्र. १०५, सांकला आर्केड, गांधी खादी भांडारच्यावर, कर्वे रोड, एरंडवणा, पुणे– ४११ ००४ ई-मेल : sahakarbharati1416@gmail.com

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने...

**आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेची नवी दिल्ली येथे (International co-operative Alliance) जागतिक सहकार परिषद झाली. या परिषदेत जवळपास १७ विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने व्यापक चर्चा झाली. या परिषदेचा आढावा घेणारा हा लेख...**




**उदय पेंडसे**
९८६९० ३४६६२


International Year of Cooperatives 2025
Cooperatives Build a Better World

संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने (International co-operative Alliance) योजलेल्या जागतिक सहकार परिषदेत घोषणा केली व त्याचे बोधचिन्ह प्रकाशित करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष घोषित करण्याची ही दुसरी वेळ आहे. प्रथमत: २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे केले गेले. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने (International co-operative Alliance) आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ साठी सहकाराच्या माध्यमातून उत्तम विश्वाची बांधणी हे ब्रीदवाक्य निश्चित केले आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने २०३० सालापर्यंत शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे पूर्णत्वास नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. हे लक्ष्य गाठण्यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका निश्चितच सहाय्यभूत ठरेल यात शंका नाही. सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी सहकारी क्षेत्राच्या योगदानाला प्रोत्साहन देऊन, आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करणे नक्कीच संयुक्तिक ठरणार आहे. संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासासाठी कोणती उद्दिष्ट निश्चित केली आहेत, त्याची माहिती थोडक्यात...

**१. गरिबी नष्ट करणे.** (No Poverty) सर्वदूर, सर्व स्तरातून व सर्व प्रकारची गरिबी नष्ट करणे.

**२. भूक मिटवणे.** (Zero Hunger) कोणीही व्यक्ती उपाशी राहता कामा नये या हेतूने पुरेसा अन्नसाठा करणे, अन्नधान्यातील पोषकता वाढविणे व शाश्वत शेतीसाठी प्रोत्साहन देणे.

**३. चांगले आरोग्य व जीवनमान.** (Good Health  Well-being) सर्व स्तरातील व्यक्तींचे आरोग्य चांगले रहावे. सर्व स्तरांतील व सर्व वयोगटांतील व्यक्तींना चांगले जीवनमान जगता यावे.

**४. दर्जेदार शिक्षण.** (Quality Education) सर्वसमावेशक व दर्जेदार शिक्षण सर्वांना मिळावे. सर्व स्तरांतील व सर्व वयोगटांतील व्यक्तींना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी. शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे.

**५. लैंगिक समानता.** (Gender Equality) स्त्री - पुरुष हा भेदाभेद नष्ट व्हावा. स्त्री - पुरुष समानता असावी, समान अधिकार असावेत. मुलींना - महिलांना सबल / सक्षम करण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

**६. स्वच्छ पाणी व स्वच्छता यंत्रणा.** (Clean Water  Sanitization) सर्वांना पिण्यायोग्य स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे. त्याचप्रमाणे सर्वदूर - सर्व शहरे तसेच गावातील स्वच्छता यंत्रणा सुसज्ज असावी.

**७. परवडणारी व स्वच्छ उर्जा.** (Affordable clean Energy) सर्वांना स्वच्छ, अपारंपारिक, आधुनिक व परवडणारी उर्जा सतत - अखंडपणे उपलब्ध व्हावी.

**८. रोजगार निर्मिती व आर्थिक विकास.** (Decent work  Economic Growth) शाश्वत व सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठी प्रोत्साहन देणे. त्याचप्रमाणे सर्वांना रोजगार उपलब्ध व्हावा व उत्पादकता वाढावी यासाठी प्रयत्न करणे.

**९. नावीन्यपूर्ण उद्योग व पायाभूत सुविधा.** (Industry Innovation Infrastructure) सर्वसमावेशक व शाश्वत उद्योग उभारताना त्यात नावीन्य व आधुनिकता आणणे. पायाभूत सुविधा निर्माण करताना संवेदनक्षमता जपणे, त्यामध्ये लवचिकता आणणे.

**१०. असमानता कमी करणे.** (Reduced Inequalities) देशांमधील व देशांतर्गत असमानता कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

**११. शाश्वत शहरांची व समुदायांची निर्मिती.** (Sustainable Cities Communities) सर्व समाज घटक गुण्यागोविंदाने व सुरक्षितपणे राहतील अशा शाश्वत शहरांची निर्मिती करणे.

**१२. वस्तूंचे उत्पादन व त्यांचा वापर.** (Responsible Consumption Production) वस्तूंचे उत्पादन व त्याचा होत असलेला वापर यामध्ये योग्य समतोल साधणारा आकृतीबंध निर्माण करणे.

**१३. वातावरण.** (Climate Action) वातावरणात होणाऱ्या प्रतिकूल बदलांची नोंद घेणे व त्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत त्वरित उपाययोजना / कारवाई करणे.

**१४. जलचर प्राण्यांचे जीवन.** (Life Under Water)

जलचर प्राण्यांच्या जीवाला धोका उत्पन्न न करता समुद्र, समुद्र किनारा, नद्यांचा वापर शाश्वत विकासासाठी करणे.

**१५. वन्यजीव.** (Life on Land) पृथ्वीवरील सर्व सजीवांचे रक्षण करणे, वनांचे / जंगलांचे संरक्षण करणे, जमिनीची धूप थांबविण्यासाठी उपाययोजना व जैवविविधतेचा ऱ्हास थांबविणे.

**१६. शांती, न्याय आणि मजबूत संस्था.** (Peace, Justice  Strong Institutions) शांतीप्रिय समाज घडविण्यासाठी, सर्वसमावेशक शाश्वत विकास व्हावा यासाठी प्रोत्साहन देणे. सर्वांना न्याय मिळण्यासाठी सर्व स्तरांवर नि:ष्पक्ष,जबाबदार संस्थांची निर्मिती करणे.

**१७. उद्दिष्टपूर्तीसाठी भागीदारी.** (Partnerships for the Goals) शाश्वत विकासासाठी व निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जागतिक स्तरावर भागिदारी करणे / सहयोग करणे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने (international cooperative Alliance) पुढील मार्गांचा अवलंब करण्याचे योजले आहे -

शाश्वत विकासात सहकारी चळवळीच्या सहभागाबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे, तसेच सहकारी क्षेत्राच्या कामकाजास योग्य ती प्रसिद्धी देणे. सहकारी चळवळीच्या विकासासाठी व वाढीसाठी माहितीची देवाणघेवाण, आकलन क्षमता वाढीसाठी प्रयत्न आणि सहयोगी संस्थांबरोबर भागीदारी. सहकारी उद्योजकीय परिसंस्था मजबूत करण्यासाठी कायदेशीर व धोरणात्मक मार्गदर्शन करणे. प्रोत्साहन देणे, त्याचप्रमाणे व्यवसायास पोषक वातावरण निर्माण करणे. तरूणांना सहकारी चळवळीत काम करण्यासाठी प्रोत्साहित करणे व चांगल्या विश्वाच्या उभारणीसाठी सहकारी चळवळीची उपयुक्तता सिद्ध करणे.

उपरोक्त चार संकल्पनांच्या आधारे, संयुक्त राष्ट्र संघाने निश्चित केलेली शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सर्व सहकारी कार्यकर्ते तसेच सहकारी संस्था प्रयत्नशील राहतील व आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष अर्थपूर्ण रीतीने साजरे करतील असा विश्वास वाटतो.

**- उदय पेंडसे, मुंबई.**

# नागरी बँका - संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक वृद्धी!

प्रतिवर्षी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडून त्यांचे नियंत्रणाखाली असणाऱ्या सर्वच प्रकारच्या आर्थिक संस्थांचा कल व प्रगती अहवाल प्रतिवर्षी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करीत असते. या अहवालाबद्दल अन्य क्षेत्रांतील सर्वच घटकांप्रमाणे सहकार क्षेत्रातील देखील प्रत्येक घटकाला उत्सुकता असते.

आर्थिक वर्ष २०२३-२०२४ अखेरचा हा अहवाल रिझर्व बँकेने प्रतिवर्षाप्रमाणे दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध केला आहे. यामध्ये सर्वच प्रकारच्या बँका तसेच नाबार्ड व रिझर्व्ह बँकेच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या अन्यही आर्थिक संस्थांबद्दलचा हा विस्तृत अहवाल आहे.

मागील काही दिवसात एकूणच काही विशिष्ट प्रिंट व सोशल मीडिया यांनी सहकाराबद्दल विशेषत: सर्वच सहकारी बँकांसंबंधी एकांगी वृत्त दिल्याने जनमानसामध्ये या क्षेत्राबद्दल नकारात्मक वातावरण तयार होत असतानाच हा रिझर्व्ह बँकेचा अहवाल जाहीर झाला असून, त्यामधील सर्वच तसेच नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत जी आकडेवारी समोर आली आहे, त्यावरून या क्षेत्राने गतवर्षीपेक्षा संख्यात्मक नसली तरी गुणात्मक वृद्धी, प्रगती केल्याचे सर्वांनाच मान्य करावे लागेल.

रिझर्व्ह बँकने आता नागरी बँकांसाठी दि. ०१.१२.२०२२ पासून सर्व युनिट व पगारदार बँका तसेच रु. १०० कोटींच्या आतील ठेवी असणाऱ्या इतर बँका 'टियर वन', रु. १०० कोटींच्या वरील व रु. १००० कोटींच्या आतील ठेवी असणाऱ्या इतर बँका - 'टियर टू', रु. १००० कोटींच्या वरील व रु. १०,००० कोटींच्या आतील ठेवी असणाऱ्या इतर बँका - 'टियर-थ्री' तर रु. १०,००० कोटींच्या वरील ठेवी असणाऱ्या इतर बँका - 'टियर-फोर' अशी चार वर्गवारी केली आहे.

याबाबत अगदी संक्षिप्त पण महत्त्वाची आकडेवारी खालीलप्रमाणे सादर केलेली असून त्या आकडेवारीवरून साधारणपणे येणारे महत्त्वाच्या निष्कर्षांची थोडक्यात माहिती पुढे दिलेली आहे.

| **तपशील** | **मार्च २०२३** | **मार्च २०२४** |
|---|---|---|
| नागरी सहकारी बँका- एकूण संख्या | १५०२ | १४७२ |
| एकूण ठेवी -(आकडे कोटीत) | रु. ५,३३,२५५/ | रु. ५,५५,४६९/ |
| एकूण कर्जे -(आकडे कोटीत) | रु. ३,३०,३२५/ | रु. ३,४६,९०३/ |
| एकूण गुंतवणूक -(आकडे कोटीत) | रु.१,९०,६२७/ | रु. १,९३,८१४/ |
| ५०० कोटींच्या आतील ठेवी असणाऱ्या बँकांची एकूण संख्या | १३०२ | १२६५ |
| ५०० कोटींच्या वरील ठेवी असणाऱ्या बँकांची एकूण संख्या | २०० | २०७ |
| ५०० कोटींच्या आतील ठेवी असणाऱ्या बँकांचे एकूण संख्येतील प्रमाण | ८७% | ८६% |
| ५०० कोटींच्या वरील ठेवी असणाऱ्या बँकांचे एकूण संख्येतील प्रमाण | १३% | १४% |
| ५०० कोटींच्या आतील ठेवी असणाऱ्या बँकांचे एकूण ठेवीत असणारा हिस्सा | २७% | २५% |
| ५०० कोटींच्या वरील ठेवी असणाऱ्या बँकांचे एकूण ठेवीत असणारा हिस्सा | ७३% | ७५% |

| **३१ मार्च २०२४ अखेर** | | | | |
|---|---|---|---|---|
| बँकांची विगतवारीनुसार आर्थिक स्थिती | टियर वन | टियर टू | टियर -थ्री | टियर -फोर |
| एकूण संख्या | ८५० | ५३८ | ७८ | ०६ |
| एकूण संख्येतील प्रमाण | ५७.७% | ३६.५०% | ५.३०% | ०.४०% |
| एकूण ठेवी रुपये (कोटीत) | ६३६२७ | १७१०३९ | १९३१०५ | १२७६९८ |
| एकूण ठेवीत असणारे प्रमाण | ११.५०% | ३०.८०% | ३४.८०% | २३.००% |
| एकूण ठेवी रुपये (कोटीत) | ४१८४२ | १०३४९८ | ११६१४३ | ८५४२० |
| एकूण ठेवीत असणारे प्रमाण | १२.१% | २९.८०% | ३३.५०% | २४.६०% |

| | **शेड्यूल्ड बँका** | **नॉन-शेड्यूल्ड बँका** | **एकूण** |
|---|---|---|---|
| संख्या | ४९ | १४२३ | १४७२ |
| एकूण ढोबळ एन पी ए प्रमाण | ५.३% | ९.१% | ७.३% |
| एकूण निव्वळ एन पी ए प्रमाण | १.३% | १.१% | १.२% |
| प्रोव्हीजन कव्हरेज रेशो (पी सी आर) | ७६.७०% | ८८.५०% | ८४.६०% |
| सी आर ए आर प्रमाण ३ टक्क्यांपेक्षा कमी असणाऱ्या बँका संख्या | १ | २८ | २९ |
| सी आर ए आर प्रमाण ३ टक्क्यांपेक्षा जादा पण ९ टक्क्यांपेक्षा कमी असणाऱ्या बँका संख्या | १ | २७ | २८ |
| सी. आर. ए. आर. प्रमाण ९ टक्क्यांपेक्षा जादा पण १२ टक्क्यांपेक्षा कमी असणाऱ्या बँका संख्या | २ | ८५ | ८७ |
| सी. आर. ए. आर. प्रमाण १२ टक्के किंवा त्यापेक्षा जादा असणाऱ्या बँका संख्या | ४५ | १२८३ | १३२८ |
| सी आर ए आर प्रमाण १२ टक्के किंवा त्यापेक्षा जादा असणारी टक्केवारी बँक शेकडा प्रमाण | ९२.००% | ९०.००% | ९०.००% |
| एकूण नफ्याची आकडेवारी - रुपये (कोटीत) | २४३५ | २२९४ | ४७२९ |
| एकूण नफ्यातील टक्केवारी बँक शेकडा प्रमाण | ५१% | ४९% | १००% |

मागील पानावरून...

**※ संख्या :–** नागरी सहकारी बँकांची संख्या मात्र ही १५०२ वरून १४७२ वर आल्याने ही संख्या ३० ने कमी झालेली दिसून येईल. सन २००४–२००५ पासून सन २०२३–२०२४ अखेर १९ वर्षांचे कालावधीत एकत्रीकरण, विलीनीकरण किंवा अवसायन/समापन इत्यादीमुळे १९२६ वरून १४७२ वरती नागरी बँकांची संख्या आली आहे. व्यापारी तसेच प्रादेशिक ग्रामीण या बँकांचीदेखील संख्या मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे आपणास दिसेल.

जागतिक स्तरावरच एकत्रीकरण व विलीनीकरणाचे वातावरण असल्याने भाविष्यात दिवसेंदिवस सर्वच प्रकारच्या बँकांची संख्या कमी होणार असून केवळ सक्षम बँकाच या पुढे टिकतील हे सत्य देखील नागरी बँकांना स्वीकारावे लागेल.



**गणेश निमकर**
**९८२२५ ६८५५०**

**※ ठेवी :–** सन २०२२–२०२३ मध्ये एकूण ठेवीमध्ये जेमतेम रु. ७,२३४/– म्हणजेच १.५% वाढ झाली होती. मात्र सन २०२३–२०२४ मध्ये रु. २२००३/– कोटीने म्हणजेच ४.१०% ने वाढ आहे. सहकारी बँका सोडून उर्वरित व्यापारी, खासगी इतर बँकांचा सरासरी ठेव वाढ दर १४% असला तरी त्यामध्ये देखील लघुवित्त बँकांचा ठेव वाढ दर ३१% तर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा हाच दर १०% आहे. ठेव वाढीचा दर अपेक्षेएवढा नसला तरी तरी सन २०२१–२०२२ मध्ये नागरी बँकांच्या एकूण ठेवी कमी झालेल्या होत्या. तसेच बँकांची संख्या कमी होणे, पर्यवेक्षीय बंधनामुळे ठेव व्याजदर कमी असणे, डिजिटल बँकिंग, नवीन स्पर्धक आणि एकूणच रिझर्व्ह बँकेच्या दंडात्मक कारवाईबद्दल सातत्याने येणाऱ्या बातम्या इ. पार्श्वभूमीवर अपेक्षित ठेव वृद्धी नसली तरी ठेव वाढीचा कल निश्चितच समाधानकारक असून या क्षेत्रावर लोकांची विश्वासार्हता वाढत असल्याचे हे लक्षण आहे.

सन २०२३–२०२४ अखेर नागरी बँकांच्या संख्येच्या दृष्टीने 'टियर वन'मधील बँकांची एकूण बँकांच्या संख्येमध्ये ५७.७० % प्रमाण असताना एकूण ठेवीतील त्यांचा हिस्सा मात्र ११.५०% आहे. सन २०२२–२०२३ अखेर हेच प्रमाण अनुक्रमे ५९.८० % व १२.६०% होते. सन २०२३–२०२४ अखेर उर्वरित तिन्ही टियरमधील (टियर दोन ते टियर चार) बँकांची एकूण बँकांच्या संख्येमध्ये ४२.३०% प्रमाण असताना एकूण ठेवीतील त्यांचा हिस्सा मात्र ८८.५०% आहे. या उलट सन २०२२–२०२३ अखेर हेच प्रमाण अनुक्रमे ४०.२०% व ८७.४०% होते. यामध्ये 'टियर चार'चे संख्या प्रमाण ०.४० असून एकूण ठेवीतील त्यांचा हिस्सा मात्र २३.००% आहे रु. ५००/कोटीचे पुढील ठेवी असणाऱ्या बँकांचे एकूण बँक संख्येतील प्रमाण १४% असून त्यांचा एकूण ठेवीतील हिस्साप्रमाण ७५% आहे. या दोन्ही बाबी सहकारी बँकिंग क्षेत्राला नक्कीच विचार करायला लावणाऱ्या आहेत.

**※ कर्जे :–** सन २०२२–२०२३ अखेर एकूण कर्जामध्ये रु. १५५८४/– कोटीने (५.००%) वाढ होती. मात्र सन २०२३–२०२४ अखेर ही वाढ रु. १६५७८/– (५.००%) एवढीच झाली आहे. ही वाढ गतवर्षी एवढीच असून ती समाधानकारक नाही. सन २०२३–२०२४ अखेर सी. डी. रेशो ६१.९५% आहे. याचा अर्थ ठेव वाढीच्या प्रमाणात कर्जवाढीसाठी अजूनही थोडा वाव आहे.




सन २०२३–२०२४ अखेर सरासरी अग्रक्रम क्षेत्र पतपुरवठा प्रमाण ५९.५०% असून सरासरी दुर्बल. या क्षेत्राचे एकत्रित पत पुरवठा प्रमाण १२.३०%. सन २०२३–२०२४ मध्ये ते गतवर्षीपेक्षा कमी झाले असून बँकांना अग्रक्रम निर्धारित प्रमाण राखण्याची काळजी बँकांना यापुढे सातत्याने घ्यावी लागेल.

**※ एनपीए अर्थात अनुत्पादक जिंदगी :–** रिझर्व बँकेच्या निष्कर्षानुसार मोठ्या कर्जामध्ये एन.पी.ए.चे प्रमाण जादा आहे. सन २०२३–२०२४ अखेर नागरी सहकारी बँकांचे सरासरी ढोबळ एनपीए प्रमाण गतवर्षी पेक्षा ८.८०% वरून ७.३०% इतके कमी झाले आहे.

सरासरी निव्वळ एनपीए गतवर्षीपेक्षा २.२०% वरून १.२०% इतकेच कमी झाले आहे. एवढेच नव्हे तर सन २०२३–२०२४ अखेर प्रोव्हिजन कव्हरेज रेशो ८४.६०% आहे.

सन २०२३–२०२४ अखेर राज्य सहकारी बँकांचे सरासरी ढोबळ एनपीए प्रमाण गतवर्षीपेक्षा ५.४० % वरून ४.९०% इतके कमी झाले असून सरासरी निव्वळ एनपीए गतवर्षीपेक्षा २.१०% वरून २.००% इतकेच कमी झाले आहे. एवढेच नव्हे तर सन २०२३–२०२४ अखेर प्रोव्हिजन कव्हरेज रेशो ६८.५०% आहे.

सन २०२३–२०२४ अखेर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सरासरी ढोबळ एनपीए प्रमाण गतवर्षी पेक्षा ९.६०% वरून ८.९०% इतके कमी झाले असून सरासरी निव्वळ एनपीए गतवर्षीपेक्षा ३.९०% वरून ३.४०% इतकेच कमी झाले आहे. एवढेच नव्हे तर सन २०२३–२०२४ अखेर प्रोव्हिजन कव्हरेज रेशो ८३.९०% आहे.

वरील आकडेवारीवरून सहकारी बँकादेखील एनपीएचे वसुली बाबतीत सतर्क असून त्यांचे प्रोव्हिजन कव्हरेज रेशो त्यांच्या सक्षमतेचे लक्षण दर्शवीत आहेत असेच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे कर्ज वाढ न होता ही प्रमाणे कमी होणे हे निश्चितच वाखाणण्यासारखे आहे.

**※ सी. आर. ए. आर. अर्थात भांडवल पर्याप्तता :–** कोणत्याही जोखीम असणाऱ्या क्षेत्राची सक्षमता ही त्याच्या भांडवल पर्याप्ततेच्या प्रमाणावर अवलंबून असल्याने बँकिंग त्याला अपवाद नाही. सरकारी मदती शिवाय व मर्यादित साधने उपलब्ध असताना नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत ही गोष्ट खूपच समाधानकारक व आशादायक असल्याचे चित्र समोर येताना दिसत आहे.

रिझर्व बँकेने नागरी बँकांची केवळ वर्गवारी बदललेली नसून बँकांचे वर्गीकरणानुसार वेगवेगळे भांडवल पर्याप्तता अर्थात सी.आर.ए.आर. किमान प्रमाण निर्धारित केले आहेत.

मार्च २०२३ अखेर नऊ टक्के पेक्षा कमी भांडवल पर्याप्तता किंवा सीआरएआर प्रमाण असणारी बँकांची एकूण संख्या १८१ होती. त्याचे एकूण संख्येत १२% प्रमाण होते. सन २०२३–२०२४ अखेर हीच संख्या ५७ झाली असून त्याचे एकूण संख्येत ४% प्रमाण आहे. सन २०२३–२०२४ या आर्थिक वर्षात या वर्गवारीतील ३० बँका जरी बंद झाल्या आहेत. हे गृहीत धरून देखील या वर्गवारीत लक्षणीय प्रगती झाली आहे. ९ टक्के पेक्षा जास्त किंवा १२ टक्क्यांपेक्षा कमी असणाऱ्या बँकांची संख्या ८७ असून त्याचे एकूण संख्येत ६%प्रमाण आहे. १२ टक्क्या पेक्षा अधिक सी. आर. ए. आर. किंवा भांडवल पर्याप्तता असणाऱ्या प्रमाण असणारी बँकांची एकूण संख्या १३२८ असून त्याचे एकूण संख्येत ९०% प्रमाण आहे. गतवर्षी १२ टक्के

मागील पानावरून...

किंवा १२ टक्क्यांपेक्षा जास्त सी. आर. ए. आर. किंवा भांडवल पर्याप्तता असणाऱ्या बँकांचे प्रमाण ८८ टक्के होते. ही बाब बँकांची आर्थिक सक्षमता दर्शवणारी असून निश्चितच समाधान देणारी आहे.

✲ **दंडात्मक कारवाई :–** रिझर्व्ह बँकेच्या दंडात्मक कारवाईबाबतीत अनेकवेळा विविध माध्यमातून चर्चा होत असते. त्याचे देखील वास्तव रिझर्व्ह बँकेने या अहवालातत मांडले आहे. सन २०२३–२०२४ मध्ये एकूण १४७२ नागरी बँकांपैकी २१५ बँकांना एकूण ८६.१० कोटी दंड रकमेपैकी रु. १२.१० कोटी दंड आकारण्यात आला. या उलट उर्वरित सर्व बँका (एन.बी.एफ.सी. सह) रु. ७४/ कोटी दंड आकारला आहे. नागरी बँकांची एकूण बँकिंग क्षेत्रामधील संख्या व त्या मानाने इतर बँकांची संख्या याची तुलना करूनच याबाबत या संबधी संबंधितांनी प्रतिक्रिया देणे अधिक योग्य होईल. यामध्ये दंडात्मक कारवाईचे समर्थन करण्याचा प्रयत्न नसून सहकारी बँकांना टार्गेट न करता या बँकावर या बाबतीत वास्तवाला धरून टीका व्हावी एवढाच माफक उद्देश आहे.

वरील सर्व परिस्थिती पाहता नागरी बँकांनी मार्च २०२३ पेक्षा मार्च २०२४ अखेर मुख्यत्वे एनपीए अर्थात अनुत्पादक जिंदगी व सी. आर. ए. आर. अर्थात भांडवल पर्याप्तता या दोन महत्त्वाच्या आघाडीवर समाधानकारक कामगिरी केल्यानेच एका बाजूला नागरी सहकारी बँकांची संख्या कमी होत असली तरी संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक वृद्धी होत आहे, असे म्हणण्यास निश्चितच वाव आहे.

**– गणेश रा. निमकर पुणे मो. ९८२२५६८५५०**

******

# साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करण्याची मागणी



**पुणे –** राज्यातील ऊसाचा गाळप हंगाम सुरू होऊन दीड महिन्याचा कालावधी पूर्ण झाला असून आजतागायत २९ लाख टन साखर उत्पादन तयार झाले असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. दरम्यान साखरेचे किमान विक्री दर ४१०० रुपये असावा अशी मागणी वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. ठोबरे यांनी शासनाकडे केली आहे.

साखर आयुक्त कार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या महितीनुसार राज्यात डिसेंबर अखेर १९० साखर कारखान्यातून २९ लाख टन साखर तयार केली आहे. यामध्ये ९६ सहकारी आणि ९४ खासगी साखर कारखान्यांनाचा समावेश आहे. १५ नोव्हेंबरला उसाचा गाळप हंगाम सुरू झाला आणि आजवर ३३८ लाख टन उस गाळप पूर्ण झाले असून सरासरी ऊतारा ८.६ टक्के मिळाला आहे. ऊस गाळप, साखरेचे उत्पादन आणि उतारा यामध्ये राज्यात कोल्हापूर विभाग आघाडीवर आहे

यंदाच्या हंगामात राज्यातील उस गाळप हंगामात अंदाजे १०० ते १०२ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे यामध्ये सुमारे १२ लाख टनाच्या जवळपास साखर इथेनोलसाठी वळविण्याचा अंदाज आहे. तसे झाले तर साखर उत्पादन ९० लाख टन पर्यंत खाली येणे शक्य आहे. तसेच इथेनोल दरात ३ ते ५ रुपयांची वाढ करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.


व्यावसायिकांसाठी खास सवलतीच्या व्याजदरात

उद्यम लघु कर्ज योजना

व्याजदर 9%* पासून

माहितीसाठी संपर्क 9823434500



- किरकोळ व्यावसायिक तसेच घाऊक व्यापारासाठी कर्ज उपलब्ध
- टर्म लोन तसेच कॅश क्रेडिट स्वरूपात कर्ज सुविधा
- मर्यादीत कालावधीसाठी

* नियम व अटी लागू.

तुम्हीच करा वीज तयार... वीज बिलाला करा हद्दपार.....

सोलर कर्ज योजना



व्याजदर 8.50%* पासून

माहितीसाठी संपर्क 9823434500

- सोलर वॉटर हिटर
- सोलर पंप
- रूफ टॉप सिस्टीम
- सोलर लाईट सिस्टीम इ. बसविणेसाठी

* नियम व अटी लागू.

अधिक माहितीसाठी नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.

Toll Free Number 18002123652

जळगाव जनता सहकारी बँक लि. जळगाव

( शेड्यूल्ड बँक )

मुख्य कार्यालय : 'सेवा' 117/119, नवी पेठ, जळगाव. ☎ 0257-2223699 ✉ jjsbl_jal@jjsbl.co.in 🌐 www.jjsbl.com

सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना।



२०२४ ७५ अमृत महोत्सव 25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

व्यापारी मित्र

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | १९०० | १३०० | ७०० |
| रजिस्टर पोस्टाने | २६०० | १७८० | ९४० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४

फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290

E-mail : sampadak@vyaparimitra.com

# बँकिंग सुधारणा विधेयकाने काय साधणार?

**बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित बँकिंग सुधारणा विधेयक २०२४ अखेर लोकसभेत मंजूर करण्यात आले. या विधेयकामुळे बँकिंग क्षेत्रात एकूण १९ बदल केले जाणार आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा १९३४, बँकिंग नियमन कायदा १९४९, स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा १९५५ इत्यादी कायद्यांमध्ये सुधारणा केल्यानंतर हे बदल प्रत्यक्षात येतील.**

मोदी ३.० सरकारच्या कार्यकाळातील पहिले हिवाळी अधिवेशन नुकतेच पार पडले. संसदेच्या या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये बरीच खडाजंगी झालेली दिसून आली असली आणि अनेकदा लोकसभेचे कामकाज तहकूब करावे लागले असले, तरी 'एक देश, एक निवडणूक' यासारखी काही महत्त्वपूर्ण विधेयके या अधिवेशनात मंजूर झाली आहेत. यामध्ये तीन डिसेंबर रोजी बँकिंग दुरुस्ती विधेयक २०२४ मंजूर करण्यात आले असून, ते देशातील बँकिंग व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या विधेयकानुसार बँकिंग क्षेत्रात एकूण १९ बदल केले जातील आणि हे बदल भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम १९३४, बँकिंग नियमन अधिनियम १९४९, भारतीय स्टेट बँक अधिनियम १९५५ आदी कायद्यांत दुरुस्ती केल्यानंतर प्रत्यक्षात येतील. या कायदे दुरुस्त्यांनंतर अवतरणाऱ्या नव्या बदलानुसार गेल्या सात वर्षांपर्यंत दावा न केलेले लाभांश, शेअर, व्याज आणि परिपक्व झालेल्या बाँडची रक्कम ही आपोआप 'इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड' म्हणजेच 'आयईपीएफ'मध्ये जमा होईल. ही रक्कम सुरक्षित ठिकाणी स्थानांतरित झाल्याने निष्क्रिय खात्यांतून होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांना चाप बसेल. शिवाय, कालांतराने जमा रकमेवर दावा करणाऱ्यांसाठी आलेल्या लोकांना 'आयईपीएफ'मध्ये गेलेली रक्कम सहजपणे काढून घेता येईल. अडकलेली रक्कम काढण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि सुलभ केली जाणार आहे.

या दुरुस्तीत सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बँक खात्याला चार नॉमिनी जोडण्याची तरतूद. सध्याच्या काळात केवळ एकच नॉमिनी देण्याची तरतूद आहे; पण ही तरतूद अडचणीची ठरत असल्याचे लक्षात आले आहे. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात खातेदाराच्या मृत्यूनंतर पैसे वाटप करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन हा बदल करण्यात आला आहे. त्यामुळे कुटुंबीयांना पैसे मिळणे सोपे होईल. याशिवाय कायदेशीर प्रक्रियेतील विलंबही कमी होईल. नॉमिनी असणारी व्यक्ती दरवेळी सक्रिय असेलच याची खात्री देता येत नाही आणि परिणामी निष्क्रिय खात्याचा गैरवापर, आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हेगारी, करचुकवेगिरी, घातपाती कारवाया होण्याची शक्यता बळावत गेली आहे. आज देशभरात वारसदार नसलेली किंवा नॉमिनीची नोंद नसलेली लाखो खाती आहेत. काही वेळा नमूद केलेल्या नॉमिनीचा मृत्यू झाल्यास खात्यातील जमा रकमेवर कोणीही दावा न केल्याने अशा प्रकारची खाती दोन वर्षांनंतर निष्क्रिय केली जातात. मार्च २०२४ पर्यंत बँकांमध्ये अशा प्रकारच्या निष्क्रिय खात्यांत सुमारे ७८ हजार कोटी रुपये पडून असल्याची माहिती समोर आली आहे आणि त्यावर कोणीही दावा केलेला नाही. सरकारच्या एका अंदाजानुसार, २०२३ च्या अखेरपर्यंत निष्क्रिय खात्यांत सुमारे एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम होती आणि त्यापैकी ४२ हजार कोटी रुपयांना कोणीही वारस नव्हता. सध्या दावा न केलेल्या रकमेत दरवर्षी २८ टक्क्यांनी वाढ होत आहे.

अर्थातच, ही स्थिती चिंताजनक आहे. निष्क्रिय खात्यांवर सतत लक्ष ठेवणे गरजेचे असल्याचे सरकारला वाटते. यासाठी केंद्रीय बँकांना दर तीन महिन्याला निष्क्रिय खात्यांची माहिती देण्याची सूचना दिली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे, दीर्घकाळ निष्क्रिय राहिलेल्या खात्यांमध्ये फेरफार होण्याची किंवा फसवणूक होण्याची शक्यता अधिक राहते. अशा खात्यांचा वापर करचुकवेगिरी, दहशतवादी कारवायांसाठी केला जात असल्याचेही मागील काळात दिसून आले आहे.

पंतप्रधान जन धन योजनेने आर्थिक शिस्त लावण्यास आणि डिजिटायझेशनच्या संकल्पनेला मूर्त रूप देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गेल्या १३ नोव्हेंबरपर्यंत देशभरात जन धन खात्यांची संख्या सुमारे ५३.९९ कोटी होती; पण यापैकी निष्क्रिय खात्यांची संख्या सुमारे ११ कोटी होती. या निष्क्रिय खात्यांत सुमारे २.३५ कोटी रुपये होते. निष्क्रिय खात्यांची एवढी मोठी संख्या असणे आणि त्यातही एवढी रक्कम असणे ही दहशतवादी कारवाया, फसवणूक आणि करचुकवेगिरीच्या शंकेला वाव देणारी ठरू शकते. गृह मंत्रालयाच्या अहवालानुसार, २०२४ च्या पहिल्या नऊ महिन्यांत सायबर फसवणुकीमुळे खातेधारकांना ११.३३ कोटी रुपयांचा चुना लागला. बँकांमधील वाढत्या निष्क्रिय खात्यांच्या संख्येवरून देशातील बँकिंग व्यवस्थेचे नियमन करणाऱ्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानेही चिंता व्यक्त केली आहे. इतकेच नव्हे, तर यासंदर्भात आरबीआयने बँकांना निर्देशही दिले आहेत. त्यानुसार निष्क्रिय खाती सक्रिय करण्यासाठी मोबाईल, इंटरनेट बँकिंग, नॉन होम शाखा, व्हिडीओ केवायसी आदी सोपी प्रक्रिया अंगीकारण्यास सांगितले आहे.

केंद्रीय बँकेच्या म्हणण्यानुसार, 'जन धन'मधील निष्क्रिय झालेल्या खात्यांत केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचे जमा असणारे पैसे काढण्यावर निर्बंध घालण्याची आवश्यकता नाही. लाभार्थी किंवा त्याच्या कुटुंबीयांतील सदस्य केवायसी प्रक्रिया पूर्ण करत असतील, तर ते पैसे काढण्याची मुभा द्यावी आणि यानुसार कृती करत आर्थिक नुकसान करू नये, अशी अपेक्षा आरबीआयने व्यक्त केली. बँक खाते निष्क्रिय झाल्यानंतर खातेधारकांचे नुकसान होतेच. अशा खात्यांवर व्याजाची रक्कम जमा करण्याचे देखील थांबविले जाते. खाते निष्क्रिय झाल्याने त्यातील खातेधारकांचे पैसे नेहमीच धोक्याखाली राहतात. कारण, त्या खात्यांतील पैशांची चोरी होण्याची शक्यता अधिक असते. ते ऑनलाईन व्यवहाराचा लाभ घेऊ शकत नाहीत. निष्क्रिय खात्यांवर देखभाल किंवा निष्क्रियता शुल्काची आकारणी केली जाते. खातेधारक ऑनलाईन बँकिंग किंवा डेबिट किंवा क्रेडिट कार्डसारख्या सुविधांचा लाभ घेण्यापासून वंचित राहतात. अनेकदा तर दावा न केलेल्या रकमेचा वापर केंद्रीय बँकेच्या शैक्षणिक आणि जनजागृती फंडसाठी केला जातो.

कल्याणकारी कामात अशा रकमेचा वापर करणे, हा यामागचा हेतू. मात्र, या तरतुदीमुळे काही वेळा दावेदार किंवा वारसदारांचे नुकसान होते.

आज अब्जावधी रुपये निष्क्रिय खात्यांत असल्याने त्याचा अर्थव्यवस्थेला कोणताही लाभ मिळताना दिसत नाही. या पैशाचा वापर कल्याणकारी योजनांसाठी झाला, तर आर्थिक घडामोडींना वेग येईल आणि त्यामुळे विकासाला चालना मिळेल, लोकांना रोजगार मिळेल. सरकारने मांडलेल्या दुरुस्ती विधेयकात एकाऐवजी चार नॉमिनी करण्याचा प्रस्ताव हा त्यादृष्टीने स्वागतार्ह आहे. आज ज्या वेगाने निनावी रक्कम वाढत आहे, ते पाहता हा प्रस्ताव उपयुक्त राहू शकतो. अर्थात, यासाठी ग्राहक किंवा नातेवाइकांत जागरूकता निर्माण करावी लागेल. तसेच आर्थिक साक्षरतेचे प्रमाण देखील वाढवावे लागेल. आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी प्रत्येक क्षणी सजग राहणे देखील गरजेचे आहे.

याखेरीज या बँकिंग सुधारणा विधेयकात सहकारी बँकांमधील संचालकांचा (अध्यक्ष आणि पूर्णवेळ संचालक वगळता) कार्यकाळ आठ वर्षांवरून १० वर्षांपर्यंत वाढवण्याची तरतूद समाविष्ट आहे. संविधान (९७ वी सुधारणा)

अधिनियम, २०११ च्या अनुषंगाने ही दुरुस्ती करण्यात आली आहे. याचे परिणाम नेमके कशाप्रकारे होतात, हे लवकरच समोर येईल.

**– संतोष घारे, ज्येष्ठ अर्थतज्ञ**

**साभार – पुढारी *******

# विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी निर्मिती आणि आधुनिकीकरण – केंद्रीय सहकार मंत्रालयाचा महत्त्वाचा निर्णय

केंद्र सरकारमधील सहकार खात्याने देशातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून येत्या पाच वर्षांत या प्रकारच्या दोन लाख संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. या संस्थांच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होईल. केंद्रीय सहकार मंत्री आणि गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीमधील समारंभात या कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवली आहे.



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

ग्रामीण भागात विकासाची गंगा आणण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून सहकाराच्या माध्यमातून या संस्था स्थापन झाल्यास ग्रामीण भागात विकासा सोबत सहकाराचा प्रचार आणि प्रसार देशभरात होणार आहे.

**❊ बहुउद्देशीय संस्था विकासाचे सहकारी प्रारूप –**

ग्रामीण भागामध्ये सहकारी तत्त्वावर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था स्थापन झाल्यास या संस्थेच्या माध्यमातून गरजू शेतकऱ्यांना कर्ज देण्यापासून अनेक वेगवेगळ्या विकासाच्या बाबी करता येणे शक्य आहे. केंद्रीय सहकार खात्याने या प्रकारच्या संस्थांसाठी ३२ प्रकारच्या व्यवसायांना परवानगी दिली आहे. सहकारी तत्त्वावर आधारित असलेले हे संस्थात्मक प्रारूप महाराष्ट्राला ज्ञात आहे.

महाराष्ट्रामध्ये शेतीच्या कर्जासाठी त्रिस्तरीय रचनेमध्ये शिखर बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी अशी रचना गेली अनेक वर्षे आहे.

ज्या संस्था व्यवस्थित चालल्या आहेत, त्यांच्यामार्फत त्या त्या भागातील ग्रामीण विकासाचे कार्य सुरळीतपणे सुरू आहे. गुजरातमध्ये देखील या प्रकारच्या संस्थांचे यश मोठ्या प्रमाणात अनुभवण्यात आलेले आहे. सहकारी तत्त्वावर आधारित विकासाचे हेच प्रारूप देशभर वापरून ग्रामीण भागातील विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारातील सहकार खात्याने हा निर्णय घेतला आहे. यामध्ये मागील तीन महिन्यात ११.६९५ संस्थांची नव्याने नोंदणी झाली आहे.

पहिल्या टप्प्यात नाबार्डला २२००० आणि एनडीडीबी यांना ५६,५०० अशा संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

**❊ बहुउद्देशीय संस्थेला व्यवसायाची मुभा –**

ग्रामीण भागामध्ये स्थापन झालेल्या या बहुउद्देशीय सहकारी संस्थेला गॅस एजन्सी घेणे, पेट्रोल पंपाची एजन्सी घेणे, खते बी–बियाणे यांचे एजन्सी घेणे अशा स्वरूपाच्या आणि ग्रामीण विकासाची निगडित अशा ३२ प्रकारच्या व्यवसायांची परवानगी देण्यात आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये या प्रकारचे प्रयोग यापूर्वी झालेले आहेत. सहकारी संस्थांनी व्यावसायिकदृष्ट्या चालविलेली किराणा दुकानांची साखळी, भांड्यांच्या दुकानाची साखळी या प्रकारचे अनुभव सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पूर्वीपासून आहेत आणि त्यांचा इतिहास यशस्वी प्रकल्पांचा आहे.

**❊ सहकारी संस्थेचे प्रारूप –**

बहुउद्देशीय संस्था स्थापन करताना सहकारी संस्थेचे प्रारूप वापरण्यात येणार आहे.

देशभरामध्ये सहकारी संस्था स्थापन करणे हे अन्य संस्था स्थापन करण्यापेक्षा सोपे आहे. समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींना यात सामावून घेणे सहज शक्य आहे. सहकारी संस्थांच्या माध्यमातून अमुल आणि इफकोसारखे प्रयोग देशात यशस्वी झालेले आहेत. याच यशस्वी प्रयोगांचे ग्रामीण प्रारूप म्हणून या बहुउद्देशीय संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागात या निमित्ताने रोजगार निर्मिती होऊ शकेल. ग्रामीण भागातील लोकांना नोकरीसाठी शहरांमध्ये जाण्याची गरज राहणार नाही.

या संस्थांच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागात अत्यावश्यक सेवा आणि गरजेप्रमाणे वस्तू या सहजपणे उपलब्ध होतील असा या संस्थांच्या स्थापनेमागचा उद्देश आहे.

सरकारी स्तरावर, विशेषतः केंद्र सरकारच्या स्तरावर या प्रकारचा प्रयोग प्रथमच देशभरात साकारणार आहे. या संस्थांचे नियंत्रण गरजेप्रमाणे नाबार्ड किंवा एनडीबीबीकडे देण्यात येईल.

**❊ सहकार क्षेत्राला चांगले दिवस –**

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर देश पातळीवर सहकार या संकल्पनेला चांगले दिवस येतील. सहकारी संस्था या अधिक प्रमाणात स्थापन होतील आणि विकासाचे नवे प्रारूप या निमित्ताने देशभरामध्ये निश्चितपणे यशस्वी होईल असा केंद्रीय सहकार खात्याचा विश्वास आहे. सहकारात काम करणाऱ्या सर्वांसाठी ही अत्यंत चांगली बातमी आहे.

या निमित्ताने पुन्हा एकदा सहकार हे तत्त्व उजळून निघेल आणि यातील प्रतिकूल बाबी किंवा नकारात्मक बाबी या हळुहळू कमी होतील. त्यासाठी आवश्यक ते कायदेदेखील करण्यात येतील. जुन्या संस्थांना बंद करण्यासाठी देखील नियम आणि कायदे करण्यात येणार आहेत. कारण एका गावामध्ये एकच संस्था असावी असा सरकारचा विचार आहे.

त्यामुळे जुन्या, बंद पडलेल्या संस्था कायमस्वरूपी बंद करण्यासाठी नियम आणि कायदे यावर सध्या विचार सुरू आहे.

केंद्र सरकारच्या सहकार खात्याने सहकाराच्या विकासाच्या दृष्टीने उचललेले हे अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल असून हे प्रारूप यशस्वी झाल्यास पुढील दशकामध्ये सहकाराचे महत्त्व नव्याने अधोरेखित होणार आहे. महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात हा प्रयोग निश्चितपणे यशस्वी होईल. महाराष्ट्र आणि गुजरातला या प्रारूपाचा चांगला अनुभव आहे. सरकारच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये सहकार क्षेत्रातील व्यक्तींनी सक्रिय सहभाग घ्यावा आणि यातून सहकाराचा विकासही करावा.

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)**

❊❊❊❊❊

## रामराज्य सहकारी बँकेच्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पुणे –** येथील रामराज्य सहकारी बँकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन श्री क्षेत्र आळंदी येथे आचार्य गोविंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बँकेच्या अध्यक्षा नंदाताई लोणकर, उपाध्यक्ष शिरीष मोहिते, पीपल्स को–ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष सुभाष मोहिते, तसेच संचालक दिलीप सातकर, रामकृष्ण फुले, बाळासाहेब रायकर, राजेश नाईकरे, विनोद शहा आदी यावेळी उपस्थित होते.

# प्राथमिक कृषी पतसंस्था

'सहकारातून समृद्धी' ब्रीदवाक्य घेऊनच केंद्रीय सहकार मंत्रालय उदयास आले. तेव्हा अगदी तळागाळातील शेतकरी वर्गाचे काळजीवाहू सरकार म्हणून या मंत्रालयाचा उदो उदो केला पाहिजे. सहकारी बँकांबरोबर प्राथमिक कृषी पतसंस्था – प्राकृप (PACS - Primary Agriculture Credit Societies) पालकत्व याच खात्याने घेतले. १९०४ साली सुरु त्या काळानुसार सहकाराने कामाला सुरुवात केली. ते काम सतत चालून होते. आता, परत सहकार मंत्रालयाने त्यावर काम करणे सुरू केले. काही पतसंस्था अस्तित्त्वात होत्या, काही लोप पावल्या, तिथे नव्याने सुरुवात केली गेली.



**वंदना धर्माधिकारी**
९८९०६ २३९१५

सर्व प्राकृप पतसंस्थांचा जोमाने विकास होताना आत्ता दिसत आहे. शेतकऱ्यांना या संस्थांचे सभासदत्त्व घ्यावे लागते. त्यांची पतवृद्धी होणे, बाजारात विक्री करणे, एकूणात मालाला भाव मिळणे ही भूमिका असते. अगदी दुर्दम्य ठिकाणचा छोट्यातला छोटा अल्पभूधारक शेतकऱ्याला यामध्ये सामावून घेतले आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे हे वाक्य गडद होऊन चमकायला लागले असे म्हणू शकतो. प्राकृप, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय अशा तिन्ही क्षेत्रातील मिळून सुमारे २,६४,००० इतक्या प्राथमिक सहकारी संस्था जोमाने कार्यरत आहेत. महाराष्ट्र यामध्ये अग्रस्थानी आहे.

कृषी क्षेत्रात कार्यरत संस्थाची वर्गवारी करताना कृषी पतसंस्था (PACS), मोठ्या क्षेत्रातील बहुउद्देशीय संस्था (LAMPS - Large Area Multi-Purpose Societies), शेतकरी सेवा संस्था (FSS - Farmers Services Societies), राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका (SC-RDBs - State Cooperative Agriculture and Rural Development Banks), आणि प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका (PCARDBs - Primary Cooperative Agriculture and Rural Development Banks) यांच्या एकत्रित कार्यरत संस्था एक लाखाचे आसपास आहेत. सगळ्याच पंचायत संस्थांमध्ये प्राथमिक कृषी पतसंस्था स्थापना करण्यासाठी, येत्या पाच वर्षांत जिल्हा आणि राज्य सहकारी बँकांकडे धोरण असायला हवे असे मत केंद्रीय सरकार मंत्री मा. अमित शाह यांनी सांगितले आहे. सुरूवातीपासून विस्तार हवा आहे. नवी दिल्लीत ग्रामीण सहकारी बँकांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करून कामकाज सुरू झालेले आहे.

वरील सर्व संस्था एकत्रित काम करीत असल्याने नजीकच्या भविष्यात देशाचे शेती उत्पन्न पटीपटीने वाढणार आणि देश समृद्ध होणार आहे. भारत इतरांचा पोशिंदा होणार असे बोलले जाते, त्याची ही नांदी आहे. देशभरात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. अशा तळागाळातील शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्त्व प्राकृपसह इतर संस्था आहेत. एकमेकांना पूरक अशी यांची कार्यप्रणाली आहे. एकमेकांच्या पाठीशी पाठ लावून कामे होतात. त्याने मिळणारा फायदा विविधांगी आणि भरघोस मिळतो. शेतकऱ्यांना बळकटी देण्यासाठी प्राकृपचे सध्या राबविण्यात येत असलेले अद्ययावत मॉडेल खूप मोठी मजल मारणार असे भाकीत याच क्षेत्रातील दर्दी मंडळी करीत आहेत. उगाच कोणी असे म्हणत नाही. याचा अर्थ बऱ्याच विविधतेने अशा जेमतेम उत्पन्न असलेल्या गरीब, छोट्या शेतकऱ्यांपासून सर्वांचा विकास करून त्यांचे राहणीमान उंचावायचा प्रयत्न सहकार क्षेत्राकडून होत आहे. या सर्व संस्थांचे सरकार दरबारी रजिस्ट्रेशन असते.

प्राकृपचे सदस्यत्व अनेक छोटेमोठे शेतकरी घेतात. त्यांचा आधारस्तंभ प्राकृप असते. मुख्य कार्य म्हणजे अडल्या-नडल्या गरजवंत शेतकऱ्यांच्या विविध गरजा पूर्ण करणे, त्याच्या अडचणी सोडवणे, सुविधा देणे, त्याला मार्गदर्शन करणे आणि त्यासाठी आर्थिक पाठबळ देणे. शेती उत्पादन करताना लागणारे सर्व काही पुरवले जाते. अल्पकालीन कर्ज देणे, पतसंस्थेत खाते काढून देणे. सरकारी अनुदानांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्राकृप प्रयत्नशील असतात. बियाणे, खते व कीटकनाशके पुरवठा करून सर्वतोपरी सदस्य शेतकऱ्यांची घडी बसवून दिली जाते. माल कुठे कसा विकायचा याचे विपणन सहकार्य दिले जाते. मालाचा भाव ठरवतानाही मध्यस्थी होते. त्याने आपोआप शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होते. एकूणात सुसूत्रता आल्याने धनधान्य अधिकाधिक येते, नफा वाढतो आणि समृद्धी नांदू लागते.

शेती करताना अनेक अडचणी संकटे यांचा सामना करावा लागतो. म्हणा इतरत्र नाही असे नक्कीच नाही. जीवन हे संकटांशिवाय जगताच येत नाही. तर, सांगायचे असे की शेतकरी दादा वा शेतकरी ताई कोणालाही कधीही काही अडचण आली, मार्गदर्शन हवे असेल तर जवळच्या प्राथमिक कृषी क्रेडिट सोसायटीमध्ये जाऊन समजून घेऊन आपले काम करून घ्यावे. आर्थिक मदतही इथे मिळू शकते. तरी आवर्जून क्रेडिट सोसायटीचे सभासदत्व घ्यावे, भविष्यात कधीही त्याची मदत होईल. शिकायला खूप काही मिळेल.

सर्व प्राथमिक कृषी पतसंस्था – प्राकृप वर सरकारी संस्था – नाबार्ड - NABARD - (National Bank for Agriculture and Rural Development.)चे वर्चस्व आहे. सर्व प्राकृपचे कामकाज नाबार्डच्या तत्त्वांनुसार केलेल्या योजनेप्रमाणे नियमाने आखून दिलेल्या पद्धतीने होते. नाबार्ड संस्था भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येत असल्याने आपोआप प्राकृपला रिझर्व्ह बँकेचे पाठबळ आहे. मोठ्या प्रमाणात यासाठी प्रोजेक्ट्स केले जात आहेत. त्यामध्ये गुंतवणूक होत आहे. तरी सर्वांनी कृषी पतसंस्थेचे सभासदत्व अवश्य घ्यावे. बाकी तिथे गेल्यावर सर्व काही तुम्हाला सांगितले जाईल. जशी समस्या येईल तसेच त्यावरील उपायदेखील पतसंस्थेत सापडेल आणि शेतात पीक तरारून येईल. तेव्हा सहभागी व्हावे, हेच हिताचे आहे. भारत सुजलाम् सुफलाम् होऊ पहात आहे. त्यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य चोख बजावले पाहिजे.

**– वंदना धर्माधिकारी.**

*****

## कमल पार्क सहकारी सोसायटी अध्यक्षपदी तुषार विश्वास, सचिव सुहास सातार्डेकर

**मुंबई** – भांडुप पश्चिम येथील कमल पार्क सोसायटीच्या व्यवस्थापन समितीची पंचवार्षिक निवडणूक झाली. तुषार विश्वासराव यांची अध्यक्षपदी तर सुहास सुरेश सातार्डेकर यांची सचिवपदी व संदीप शिवराम बिरजे यांची खजिनदारपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी प्रभाकर तुकाराम कांबळे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेंद्र डी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. संचालक पदावर प्रशांत कुमार शेरवेगार, प्रशांत परब व संचालिकापदी सविता प्रमोद सावंत यांची निवड करण्यात आली.

## गृहरचना संस्था

# शंका समाधान

## अपार्टमेंट कायदा - १९७०



### अपार्टमेंट संघाचे उपविधी (बायलॉज)

**व्यवस्थापन समिती - प्रकरण ४**

**नियम क्र.१९ –** अपार्टमेंट संघाचे व्यवस्थापन हे व्यवस्थापकीय मंडळामार्फत चालवले जाईल. (बोर्ड ऑफ मॅनेजर)

**नियम क्र.२० –** अपार्टमेंट संघाच्या प्रत्येक व्यवस्थापकीय मंडळाचे प्रमुख काम म्हणजे संघाचे व्यवस्थापन हे उपविधीनुसार तसेच अपार्टमेंट कायद्यातील तरतुदीनुसार चालवणे. तसेच प्रसंगी काही नियम करावे लागल्यास ते कायद्याच्या चौकटीत बसवून तयार करणे व त्याप्रमाणे संघाचे कामकाज करणे.

**नियम क्र.२१ – व्यवस्थापकीय मंडळाची इतर कर्तव्ये–**

प्रत्येक व्यवस्थापकीय मंडळ उपविधी तसेच संघाच्या ठरावाप्रमाणे दिलेल्या कर्तव्याव्यतिरिक्त इतर जबाबदाऱ्या पार पाडेल याचा तपशील पुढीलप्रमाणे–



**ॲड. जयंत कुलकर्णी**
**९४२२० ०७५१०**

१) सामाईक जागा तसेच प्रतिबंधित जागा व तेथील सेवा-सुविधांची वेळोवेळी देखभाल-दुरुस्ती करणे.

२) मासिक सेवा-शुल्क किंवा वर्गणी सभासदांकडून गोळा करणे.

३) अपार्टमेंटच्या देखभालीसाठी व व्यवस्थापनासाठी लागणारा कर्मचारी वर्ग नेमणे, त्यांचे कामावर नियंत्रण ठेवणे, त्यांना मासिक पगार देणे, त्यांना कामावरून काढणे यासारखी आवश्यक कामे.

४) अपार्टमेंट संघाचे वेळोवेळी हिशोब ठेवणे, हिशोब पत्रके बनवून घेणे व त्यानुसार माहिती लेखापरीक्षकांना पुरवणे.

५) अपार्टमेंट संघाच्या सचिवांनी किंवा खजिनदारांनी ठेवलेली हिशोब पुस्तके वेळोवेळी तपासणे, यासारखी सर्व कामे.

६) दैनंदिन खर्चास वेळोवेळी मान्यता देणे, रोख शिल्लक रक्कम तपासणे, किंवा इतर किरकोळ कामे करणे.

७) रोजच्या रोज कॅश-बुक (रोखीची नोंदवही) लिहिले जाते किंवा नाही ते पाहणे, तसेच त्यावर अधिकृत केलेल्या व्यवस्थापक समिती सदस्यांची स्वाक्षरी आहे किंवा नाही हे तपासणे.

८) सभासदांकडून संघाकडे प्राप्त झालेल्या लेखी तक्रारींची दखल घेणे व त्यावर योग्य ती कार्यवाही करणे.

**नियम क्र.२२ – व्यवस्थापक (मॅनेजर) –**

उपरोक्त नियम क्र.२१ मध्ये उल्लेखनीय कर्तव्याची पूर्तता करण्यासाठी व्यवस्थापक समिती संघाचे सर्व व्यवस्थापन पहण्यासाठी पगारी व्यवस्थापक (मॅनेजर) नेमेल. तसेच नेमलेल्या व्यवस्थापक अपार्टमेंट कायद्यानुसार तसेच उप-विधीमधील तरतुदीनुसार कामकाज चालवेल.

**नियम क्र.२३ – निवडणूक व पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ**

अपार्टमेंट संघाच्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये नेमलेल्या ५(पाच) व्यवस्थापकीय मंडळातील २ व्यवस्थापकांचा कार्यकाळ ३(तीन) वर्षांचा असेल तसेच इतर २(दोन) व्यवस्थापकांचा कार्यकाळ २(दोन) वर्षांचा असेल व उर्वरित एका व्यवस्थापकाचा कार्यकाळ १ वर्षाचा असेल अशा पद्धतीने ५ व्यवस्थापकीय सदस्यांचे मंडळ कामकाज पाहील.

याप्रमाणे व्यवस्थापकांचा कार्यकाळ संपल्यावर नवीन व्यवस्थापकांची नियुक्ती संघातर्फे केली जाईल व त्याप्रमाणे संघाचे व्यवस्थापन कार्य चालेल. मोठ्या संख्येच्या अपार्टमेंटमध्ये व्यवस्थापकीय मंडळाची नियुक्ती करण्यात येईल. नवीन व्यवस्थापक येईपर्यंत जुन्याच व्यवस्थापकाने जरी कार्यकाळ संपला असला तरी कार्यरत रहावे. त्यामुळे संघाचे कामकाज खोळंबले जाणार नाही.

**नियम क्र.२४–** व्यवस्थापकीय मंडळातील एखाद्या सदस्याच्या राजीनाम्याने पद रिक्त झाले तर, व्यवस्थापक समिती बहुमताने (मेजॉरिटी) आपल्या अधिकारात अन्य कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करू शकेल. त्यावेळी व्यवस्थापन समितीला गणसंख्येची (कोरम) अट असणार नाही. या पद्धतीने नियुक्त केलेल्या व्यवस्थापक समिती सदस्य पुढील व्यवस्थापक सदस्याची निवड/नियुक्ती पुढील वार्षिक सभेत होईपर्यंत कार्यरत राहील.

**नियम क्र.२५ – व्यवस्थापकाला काढून टाकणे**

संघाने नियुक्त केलेल्या व्यवस्थापकाला (मॅनेजर) काही कारणाने काढावयाचे झाल्यास सर्वसाधारण सभा किंवा विशेष सर्वसाधारण सभेमध्ये त्याला बोलावून त्याची बाजू ऐकून घेतल्यानंतर जर त्याची बाजू पटली नाही, तर उपस्थित असलेल्या सर्व अपार्टमेंट धारकाच्या बहुमताच्या निर्णयानुसार त्याला म्हणजे व्यवस्थापकाला (मॅनेजर) काढून टाकता येवू शकते व त्याचे जागी नवीन (मॅनेजर) व्यवस्थापकाची नियुक्ती करता येवू शकते.

**नियम क्र.२६ – व्यवस्थापक समितीची बैठक**

नवनिर्वाचित व्यवस्थापक समितीची बैठक निवडून आल्यानंतर १० (दहा) दिवसात व्यवस्थापकाने (मॅनेजर) बोलावली पाहिजे. त्यासाठी स्वतंत्र नोटीस किंवा पूर्वसूचना देण्याची आवश्यकता नाही. अर्थात त्या बैठकीला जास्तीत जास्त नवीन व्यवस्थापकीय सदस्य हजर असणे आवश्यक आहे. तरच ती बैठक कायदेशीररीत्या ग्राह्य धरली जाऊ शकेल.

क्रमश:

**ॲड. जयंत कुलकर्णी**
Email - advjgk@yahoo.co.in

*****



दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ
THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
Regd.No.YML/BNK/114
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - Phone : 07232 - 244241, 243703, 237442
E-mail : ho_adm@yavatmalurbanbank.com - Website : www.yavatmalurbanbank.com
ISO 9001:2015& ISO 27001:2013 CERTIFIED BANK
कर्जाचे
अत्यंत माफक
व्याज दर
8.25%*
पासुन सुरू
आम्ही जपतो
वारसा
विश्वासाचा
| डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर,
श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर,
श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.प्रविण पांडुरंग खांदवे (तज्ञ संचालक),
श्री.पियुष कैलासचंद्र खेतान (तज्ञ संचालक)

# सायबर सुरक्षेत घटना व्यवस्थापन

सायबर सुरक्षेत घटना व्यवस्थापन (Incident Management) अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण सायबर हल्ले किंवा सुरक्षा घटनांचा वेळीच योग्य प्रतिसाद देणे संस्थेच्या डेटाचे, प्रतिष्ठेचे आणि व्यवसायाचे रक्षण करण्यासाठी गरजेचे असते. सायबर सुरक्षेत घटना व्यवस्थापनाची प्रक्रिया काही विशिष्ट टप्प्यांमध्ये विभागली जाते, ज्यामध्ये संभाव्य हल्ल्यांचे ओळख, त्यावर त्वरित प्रतिसाद आणि पुन्हा अशा प्रकारच्या घटनांना टाळण्यासाठी योग्य उपाययोजना केल्या जातात.



**१. घटना व्यवस्थापन म्हणजे काय?**

घटना व्यवस्थापन म्हणजे सायबर हल्ला किंवा सुरक्षा उल्लंघन झाल्यावर, त्याला त्वरित प्रतिसाद देऊन नुकसान कमी करणे, त्या घटनेचे संपूर्ण दस्तावेज तयार करणे आणि भविष्यात अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे. हे संस्थेच्या सायबर सुरक्षा धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. सायबर सुरक्षेत, एकाच क्षणी अनेक प्रकारचे हल्ले आणि उल्लंघन होऊ शकतात, जसे की डेटा चोरी, मालवेअर हल्ला, रॅन्समवेअर हल्ला, डीओएस (Denial of Service) हल्ला इत्यादी. घटना व्यवस्थापनाचा उद्देश आहे की हल्ल्यांचा वेळीच त्वरित प्रतिसाद दिला जाईल आणि संस्थेचे डेटा, प्रणाली आणि इन्फ्रास्ट्रक्चरचे नुकसान कमी होईल.

**२. घटना व्यवस्थापनाचे महत्त्व :** सायबर सुरक्षेत, घटना व्यवस्थापनाचे महत्वाचे काही मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:

❊ **नुकसान कमी करणे :** वेळीच प्रतिसाद दिल्यास संस्थेच्या प्रणालीचे आणि डेटाचे नुकसान कमी होऊ शकते. हल्ला अधिक वेळ चालू राहिल्यास नुकसान अधिक होण्याची शक्यता असते. ❊ **प्रतिष्ठा संरक्षण :** सायबर हल्ल्यामुळे कंपनीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचू शकतो, ज्यामुळे ग्राहकांचा विश्वास कमी होऊ शकतो. योग्य घटना व्यवस्थापनाद्वारे कंपनीचे ब्रँड आणि ग्राहकांच्या विश्वासाचे रक्षण केले जाऊ शकते. ❊ **कायदेशीर बाबींचे पालन :** अनेक उद्योगात आणि देशांमध्ये डेटा उल्लंघनासंबंधीत कायदे आणि नियम आहेत. या नियमांचे पालन करण्यासाठी योग्य घटना व्यवस्थापनाची आवश्यकता असते. ❊ **धोरण आणि संरचना सुधारणा :** घटना व्यवस्थापनाच्या प्रक्रियेदरम्यान जे अनुभव मिळतात, त्यानुसार भविष्यातील धोरणे सुधारली जाऊ शकतात.

**३. घटना व्यवस्थापनाचे टप्पे :** घटना व्यवस्थापनाची प्रक्रिया खालील टप्प्यांमध्ये विभागली जाते:

**१. तयारी** (Preparation) : घटना व्यवस्थापनाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी आधीपासून तयारी करणे गरजेचे आहे. यामध्ये संस्थेला घटनेदरम्यान काय करायचे याची स्पष्ट कल्पना असली पाहिजे. हा टप्पा संस्थेच्या सायबर सुरक्षा धोरणाचा भाग असतो. यामध्ये घटना व्यवस्थापन योजना तयार करणे, कर्मचारी प्रशिक्षण देणे आणि योग्य साधने आणि उपाययोजना लागू करणे यांचा समावेश असतो.

**२. ओळख** (Identification) : सायबर हल्ला किंवा उल्लंघनाची ओळख करणे हा या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे. अनेक वेळा हल्ला होताना किंवा झाला असताना त्वरित ओळखणे कठीण असते. योग्य मॉनिटरिंग साधने आणि लॉग्जच्या माध्यमातून हल्ल्याचे वेळीच संकेत मिळाले पाहिजेत. उदाहरणार्थ, नेटवर्कमध्ये असामान्य ट्रॅफिक किंवा प्रणालीच्या कार्यप्रदर्शनात अचानक बदल दिसल्यास संभाव्य हल्ल्याची शक्यता असते.

**३. प्रतिबंधक उपाय** (Containment) : हल्ला ओळखल्यानंतर त्याचा प्रसार रोखण्यासाठी आणि प्रणालीचे नुकसान कमी करण्यासाठी त्वरित प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, प्रभावित प्रणाली किंवा नेटवर्कला इतर भागांपासून वेगळे करणे, संक्रमित फाइल्स काढणे किंवा संदिग्ध सेवांना त्वरित बंद करणे या उपाययोजना घेता येऊ शकतात.

**४. दुरुस्ती** (Eradication): हल्ला पूर्णपणे थांबल्यानंतर, हल्ल्याची मूळ कारणे शोधून त्या कारणांचे निराकरण करणे गरजेचे असते. हे टप्पा सुनिश्चित करतो की पुन्हा तशीच घटना घडणार नाही. उदाहरणार्थ, मालवेअरची स्वच्छता करणे, दुर्बलता पॅच करणे, किंवा वापरकर्त्याच्या खात्यातील अयोग्य प्रवेश अधिकार रद्द करणे.

**५. पुनर्प्राप्ती** (Recovery) : हल्ला थांबवल्यानंतर, संस्थेची प्रणाली आणि डेटा परत सुरक्षित स्थितीत आणणे आणि त्याच वेळी त्या प्रणालीची सुरक्षा पुन्हा तुटणार नाही याची खात्री करणे हा टप्पा आहे. प्रणाली पुनर्रचना करणे, बॅकअप पुनर्संचयित करणे आणि सुरक्षा उपायांची तपासणी करणे आवश्यक असते.

**६. धडे शिकणे** (Lessons Learned) : घटना घडल्यावर त्या घटनेतील शिकवण मिळाल्याशिवाय प्रक्रिया पूर्ण होत नाही. या टप्प्यात घटनेचे सविस्तर विश्लेषण करून काय चुकले, काय सुधारता येईल आणि भविष्यात असे हल्ले टाळण्यासाठी काय करावे लागेल हे समजून घेतले जाते. तसेच, नवीन धोरणे लागू करण्यास मदत होते.

**४. सायबर सुरक्षा घटना व्यवस्थापनाचे चॅलेंजेस :** घटना व्यवस्थापनाच्या प्रक्रियेदरम्यान अनेक आव्हाने येतात:

❊ **हल्ल्यांची ओळख करणे कठीण असणे :** काही हल्ल्ये अगदी सहजतेने आणि गुपचुपपणे होतात. त्यांची त्वरित ओळख करणे अत्यंत कठीण असते, ज्यामुळे नुकसान अधिक होण्याची शक्यता असते.

❊ **तांत्रिक कुशलतेचा अभाव :** घटना व्यवस्थापनाच्या प्रक्रियेसाठी अत्यंत उच्च तांत्रिक कुशलता आवश्यक असते. सर्व संस्थांकडे अशा कुशलतेची कमतरता असू शकते.

❊ **वेळेचे बंधन :** सायबर घटना व्यवस्थापन वेळेवरच प्रभावी ठरते. उशीर झाल्यास नुकसान अधिक होऊ शकते.

❊ **सतत बदलणारे हल्ले आणि धोके :** सायबर हल्लेखोर नवीन तंत्रांचा वापर करून सतत बदलत असतात, ज्यामुळे सुरक्षेचे उपायही नियमितपणे अद्ययावत करावे लागतात.

**५. घटना व्यवस्थापनाचे सर्वोत्तम पद्धती** (Best Practices) : सतत बदलणाऱ्या सायबर धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी काही सर्वोत्तम पद्धतींना अनुसरणे आवश्यक आहे:

❊ **घटना व्यवस्थापन योजना तयार करणे :** प्रत्येक संस्थेने आपली घटना व्यवस्थापन योजना तयार करून ती सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना समजून सांगितली पाहिजे. ❊ **स्वयंचलित साधनांचा वापर :** सायबर हल्ल्यांची त्वरित ओळख करण्यासाठी आणि त्यांना प्रतिसाद देण्यासाठी स्वयंचलित मॉनिटरिंग साधनांचा वापर करणे प्रभावी ठरते. ❊ **कर्मचारी प्रशिक्षण :** सायबर सुरक्षा प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना सतत दिले पाहिजे. प्रत्येकजण योग्य प्रतिसाद देऊ शकेल याची खात्री करून घेणे महत्त्वाचे आहे. ❊ **नियमित सुरक्षा तपासणी :** सुरक्षा धोरणे, प्रणाली आणि उपाययोजना नियमितपणे तपासणे आणि अद्ययावत करणे गरजेचे आहे.

**६. निष्कर्ष :** सायबर सुरक्षा घटना व्यवस्थापन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे जी संस्थेच्या सुरक्षेला मजबूत करण्यासाठी महत्त्वाची आहे. योग्य प्रकारे सायबर घटना व्यवस्थापन राबवल्यास संस्थेचे डेटा, प्रतिष्ठा आणि व्यवसायाचे संरक्षण प्रभावीपणे होऊ शकते. योग्य तयारी, प्रशिक्षित कर्मचारी, आणि वेळेवर प्रतिसाद हे घटक सायबर सुरक्षा घटना व्यवस्थापनाच्या यशाची गुरुकिल्ली आहेत.

**– राधिका निकुंभ**
SOC शाश्वत प्रायव्हेट लिमिटेड

सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार कायदा व वसुलीची प्रक्रिया | २००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |
| ४ | डिजीटल तंत्रज्ञानाचे धोके व सावध, सुरक्षित वापर | १५०/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

24 CARAT SECURITY FOR YOUR VALUABLES

Godrej

# UNMATCHED SECURITY
## UNCOMPROMISED STRENGTH



• Defender Aurum Pro Safe • Anti Intrusion Fogging Device
• Strong Room Door • Defender Prime Safe • Gold Testing Machine

SCAN TO KNOW MORE

For more information contact:

**Sibashis Paul** 9854026321

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**


भरभराटीचे लक्षण म्हणजे उद्योगाची वास्तू,
जनसेवेचे कर्ज म्हणेल तथास्तु !
Office
Industrial Shed
BRANDING
Shops
जनसेवा उद्योग वास्तू
कर्ज योजना
त्वरीत मंजूरी
आकर्षक व्याजदर
अत्यल्प प्रोसेसिंग फी
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३
व्हॉट्सअप नंबर : 89565 47595 www.janasevabankpune.net

## सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2025
# बँक / पतसंस्था दैनंदिनी

**नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश**

**देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...**




## नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२५

किंमत रु. 500/-

**अधिक प्रतींसाठी विशेष सवलत**

आजच नोंदणी करा!




## नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२५

किंमत रु. 400/-

**अधिक प्रतींसाठी विशेष सवलत**

आजच नोंदणी करा!

**सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध'**

कार्यालय : ऑफिस नं. 15, विष्णुप्रिया अपार्टमेंट,
गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - 411 030
मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

safe age
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

**Our Certificates**

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 — CM/L-7500087614

IS 550 : 2014 — CM/L-3978088

IS 11188 : 2014 — CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,**
**Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,**
**Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**


AURO®
SINCE 1948
MAHARASHTRA TRADING CO.
Your valuables are safe and secure.
We make it sure!
ISO CERTIFIED ISO ISO 9001 : 2008
WE ARE PROVIDED FOR
PHYSICAL SECURITY PRODUCTS SALE'S & SERVICES IN
ALL MAHARASHTRA REGION
CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE
Our trusted partners for 75 years
Contact : Mrs. Suvarna Kshirsagar
Office Address : 1453, Shop No. 06,shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002
mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com
7559283467 I 9685061515 I 9879791521

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

# ॲसेट बॅक्ड क्रेडिट

## तुमच्या व्यवसायवृध्दीसाठी सदैव तत्पर

**@9.25%*** द.सा.पासून

- कर्जाची रक्कम ₹ 1 कोटी* पर्यंत
- वैयक्तिक / सर्व व्यावसायिक घटकांसाठी कर्ज
- परतफेडीचा कालावधी कमाल 120 महिने *



*नियम व अटी लागू.

www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466

**Registered - SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099**
**Magazine Post Reg. No. : MSD/057/2025**
**(Publication Date - 05/01/2025) Posting on 07/01/2025 Posting at Magazine Post, Mumbai PSO, Mumbai 400 001**




**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

**प्रति,**